बृहन्मुंबई महानगरपालिका

# बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (शिस्त व अपील) नियम, २०१५

(दि.३१.०५.२०१९ पर्यंत सुधारित)

# बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (शिस्त व अपील) नियम, २०१५

## अनुक्रमणिका


| नियम क्रमांक | शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **भाग एक – सर्वसाधारण** | |
| १. | संक्षिप्त नाव व प्रारंभ | १ |
| २. | अन्वयार्थ | १-६ |
| ३. | प्रयुक्ती | ६ |
| | **भाग दोन – (अ) निलंबन** | |
| ४. (अ) | निलंबन | ७-११ |
| | **भाग दोन – (ब) प्राथमिक चौकशी** | |
| ४.(ब) | प्राथमिक चौकशी | १२-१३ |
| | **भाग तीन - शिक्षा आणि शिस्तभंगविषयक प्राधिकरणे** | |
| ५. | शिक्षा | १४-२० |
| ६. | शिस्तभंगविषयक प्राधिकारी | २० |
| ७. | कार्यवाही सुरू करणारा प्राधिकारी | २०-२१ |
| | **भाग चार - शिक्षा करण्याबाबतची कार्यपध्दती** | |
| ८. | जबर शिक्षा करण्याबाबतची कार्यपध्दती (खात्यांतर्गत सर्वंकष चौकशी) | २२-३७ |
| ९. | चौकशी अहवालावरील कार्यवाही | ३७-३९ |
| १०. | किरकोळ शिक्षा देण्याबाबतची कार्यपध्दती (खात्यांतर्गत संक्षिप्त चौकशी) | ३९-४१ |
| ११. | कर्मचाऱ्यास आदेश कळविणे | ४१ |
| १२. | एकत्रित कार्यवाही | ४१-४२ |
| १३. | विवक्षित प्रकरणांमध्ये विशेष कार्यपध्दती | ४२-४३ |

| नियम क्रमांक | शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १४. | राज्य शासन, स्थानिक प्राधिकरण, इत्यादींना ज्यांच्या सेवा उसन्या दिलेल्या असतील अशा अधिकाऱ्यांच्या बाबतीतील तरतूदी | ४३-४५ |
| १५. | राज्य शासन, स्थानिक प्राधिकरण इत्यादीकडून उसन्या घेतलेल्या अधिकाऱ्यांसंबंधी तरतूद | ४६-४७ |
| | **भाग पाच – अपीले** | |
| १६. | ज्याविरुध्द कोणतेही अपील करता येत नाही असे आदेश | ४८ |
| १७. | ज्याविरुध्द अपील करता येते असे आदेश | ४८-५० |
| १८. | अपिलीय प्राधिक्कारी | ५१ |
| १९. | अपिलांकरिता कालमर्यादा | ५२ |
| २०. | अपिलाची पध्दती, स्वरूप, आशय आणि अपील सादर करणे | ५२-५३ |
| २१. | अपील पुढे पाठविणे | ५३ |
| २२. | अपिलावर विचारविनिमय(नवीन तरतूद) | ५४-५७ |
| २३. | अपिलातील आदेशांची अंमलबजावणी | ५७ |
| | **भाग सहा - पुनर्विलोकन** | |
| २४. | पुनर्विलोकन | ५८-५९ |
| | **भाग सात – संकीर्ण** | |
| २५. | आदेश, नोटिसा इत्यादींची बजावणी | ६० |
| २६. | कालमर्यादा शिथिल करण्याचा आणि उशीर माफ करण्याचा अधिकारी | ६१ |
| २७. | निरसन व व्यावृत्ती | ६१-६२ |
| २८. | शंकानिरसन | ६२ |

# बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (शिस्त व अपील) नियम, २०१५

बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ६४(३)(अ) अनुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांनी खालील * नियम तयार केले आहेत.

## भाग एक – सर्वसाधारण

**१. संक्षिप्त नाव व प्रारंभ:-**

(एक) या नियमांना बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (शिस्त व अपील) नियम, २०१५ असे [१]म्हणण्यात यावे. [२]यापुढे अन्यत्र विशेषकरून अन्य नियमाचे नाव उद्धृत केले नसेल, तर नियम याचा अर्थ 'बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (शिस्त व अपील) नियम, २०१५ अन्वयेचे नियम' असा असेल.

(दोन) सदर नियम ह्याबाबत महानगरपालिका आयुक्त अधिसूचित करतील त्या दिनांकापासून अंमलात येतील.

**२. अन्वयार्थ:-**

या नियमांमध्ये संदर्भानुसार अन्यथा अर्थ लावणे आवश्यक नसेल तर -

(अ) ''महानगरपालिका'' याचा अर्थ वेळोवेळी सुधारित केलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे महानगरपालिका.

---

*महानगरपालिकेने ठराव क्र.११४९ दि.०७.१०.२०१६ अन्वये या नियमांना मंजूरी दिली आहे. महानगरपालिका आयुक्तांच्या आदेश क्र.एमपीएम/२/७५७ दि.२२.१२.२०१६ अनुसार हे नियम दि.२१.११.२०१६ पासून अंमलात आले आहेत.

'बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (शिस्त व अपील) नियम, २०१५' मध्ये सुचिवण्यात आलेल्या सुधारणांना स्थायी समितीचा ठराव क्र.१६७७ दि.१३.०२.२०१९ व महानगरपालिकेचा ठराव क्र.४६ दि.३१.०५.२०१९ अन्वये मंजूरी प्राप्त झाली. सदर सुधारित नियम दि.०१.०९.२०२० पासून अंमलात आले. यामध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात आल्या:-

[१] 'म्हणता येईल' या ऐवजी 'म्हणण्यात यावे' हे शब्द दाखल करण्यात आले.

[२] यापुढे अन्यत्र विशेषकरून अन्य नियमाचे नाव उद्धृत केले नसेल, तर नियम याचा अर्थ 'बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (शिस्त व अपील) नियम, २०१५ अन्वयेचे नियम' असा असेल, हे शब्द जादा दाखल करण्यात आले.

(ब) ''महानगरपालिका आयुक्त'' म्हणजे बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ५४ अन्वये नियुक्त केलेले बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त व त्यामध्ये कलम ५४ च्या पोटकलम (३) अन्वये नियुक्ती केलेले अतिरिक्त आयुक्त आणि कलम ५९ च्या पोटकलम (३) अन्वये नियुक्त केलेले हंगामी आयुक्त यांचा समावेश होतो.

(क) ''महानगरपालिका उप-आयुक्त'' म्हणजे बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ५५ मध्ये व्याख्या केलेले महानगरपालिका उप-आयुक्त.

(ड) महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या संबंधात [३]''**नियुक्ती प्राधिकारी**'' याचा अर्थ-

(एक) महानगरपालिका कर्मचारी त्यावेळी ज्या सेवेतील सदस्य असेल त्या सेवेमध्ये किंवा महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या सेवेचा ज्या श्रेणीमध्ये त्यावेळेस समावेश केलेला असेल, त्या श्रेणीमध्ये नियुक्ती करण्यास सक्षम असणारे [४]प्राधिकारी, किंवा

(दोन) महानगरपालिका कर्मचारी जे पद त्यावेळी धारण करीत असेल त्या पदावर नियुक्ती करण्यास सक्षम असणारे [५]प्राधिकारी, किंवा

(तीन) ज्या [६]प्राधिकाऱ्याने महानगरपालिका कर्मचाऱ्याची नियुक्ती यथास्थिती, अशा सेवेत, श्रेणीमध्ये किंवा अशा पदावर केली [७]असतील ते प्राधिकारी, किंवा

---

[३] ''नियुक्ती प्राधिकरण'' या ऐवजी ''नियुक्ती प्राधिकारी'' हे शब्द दाखल करण्यात आले.

[४, ५] ''प्राधिकरण'' या ऐवजी ''प्राधिकारी'' हे शब्द दाखल करण्यात आले.

[६] ''प्राधिकरणाने'' या ऐवजी ''प्राधिकाऱ्याने'' हे शब्द दाखल करण्यात आले.

[७] ''असेल ते प्राधिकरण'' या ऐवजी ''असतील ते प्राधिकारी'' हे शब्द दाखल करण्यात आले.

(चार) महानगरपालिका कर्मचारी अन्य कोणत्याही सेवेचा स्थायी सदस्य असून किंवा अन्य कोणतेही स्थायी पद कायम धारण करीत असून महानगरपालिकेच्या अखंड सेवेत असतो, अशा बाबतीत ज्या [८]प्राधिकाऱ्याने त्याची त्या सेवेमध्ये किंवा त्या सेवेतील कोणत्याही श्रेणीत किंवा त्या पदावर नियुक्ती केली असेल ते [९]प्राधिकारी किंवा त्यापैकी जे अत्युच्च [१०]असतील ते प्राधिकारी, असा आहे.

(इ) **''महानगरपालिका कर्मचारी''** याचा अर्थ महानगरपालिकेच्या कामकाजासंबंधातील महानगरपालिकेच्या कोणत्याही सेवेत किंवा पदावर नियुक्त केलेली व्यक्ती असा आहे आणि त्यामध्ये ज्यांची सेवा तात्पुरती भारतातील कोणत्याही शासन किंवा कंपनी, महामंडळ, संघटना, स्थानिक प्राधिकरण किंवा अन्य कोणतेही प्राधिकरण किंवा मंडळ यांच्याकडे सोपविली आहे, मग त्यांचे वेतन महानगरपालिकेच्या निधीव्यतिरिक्त अन्य मार्गाने काढले जात असले तरीही अशा महानगरपालिका कर्मचाऱ्यांचा समावेश होतो. तसेच जी व्यक्ती भारतातील कोणत्याही शासन किंवा कंपनी, महामंडळ, संघटना, स्थानिक प्राधिकरण किंवा अन्य कोणतेही प्राधिकरण किंवा मंडळ यांच्या सेवेत आहे, आणि जिची सेवा तात्पुरती महानगरपालिकेकडे सुपूर्द केली आहे, अशा व्यक्तीचाही यात समावेश होतो. परंतु यामधून महानगरपालिकेत नियुक्त केलेले मानद कर्मचारी वगळण्यात आले आहेत.

---

[८] ''प्राधिकरणाने'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याने'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[९] ''प्राधिकरण'' या शब्दाऐवजी ''प्राधिकारी'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[१०] ''असेल ते प्राधिकरण'' या ऐवजी ''असतील ते प्राधिकारी'' हे शब्द दाखल करण्यात आले.

(फ) **''सक्षम प्राधिकारी/प्राधिकरण''** म्हणजे या नियमाखाली असलेले कोणतेही अधिकार वापरण्याच्या संदर्भात महानगरपालिका आयुक्त किंवा महानगरपालिका उप आयुक्त [११]तसेच सदर प्राधिकाऱ्यांकडून सर्वसाधारण किंवा विशेष अधिकार प्रदानाद्वारे प्राधिकृत केलेले अधिकारी.

(ग) **''शिस्तभंगविषयक प्राधिकरण''** म्हणजे बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ८३ अनुसार महानगरपालिका कर्मचाऱ्यांना शिक्षा देण्याचे अधिकार असलेले प्राधिकारी / प्राधिकरण,[१२]तसेच सदर प्राधिकाऱ्यांकडून विशेष अधिकार प्रदानाद्वारे प्राधिकृत केलेले अधिकारी.

(ह) [१३]**''चौकशी प्राधिकारी''** याचा अर्थ, महानगरपालिका आयुक्त यांनी किंवा शिस्तभंगविषयक [१४]प्राधिकारी यांनी एखाद्या महानगरपालिका कर्मचाऱ्याविरूध्द एखाद्या प्रकरणी चौकशीची कारवाई करण्यासाठी सर्वसाधारण अथवा विशेष आदेशाद्वारे नियुक्त करण्यात आलेला अधिकारी किंवा समिती.

[१५]**टीपः**- यामध्ये प्रमुख अधिकारी (चौकशी), तसेच महानगरपालिका अधिकारी नसलेला परंतु एखाद्या प्रकरणी चौकशी करण्याकरिता महानगरपालिका आयुक्तांनी विशेष अधिकाराद्वारे नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांचा समावेश होतो.

---

[११] ''किंवा विशेष अथवा सर्वसाधारण आदेशान्वये प्राधिकृत केलेला अधिकारी'' या शब्दांऐवजी ''तसेच सदर प्राधिकाऱ्यांकडून सर्वसाधारण किंवा विशेष अधिकार प्रदानाद्वारे प्राधिकृत केलेले अधिकारी'' असे शब्द दाखल करण्यात आले.

[१२] ''तसेच सदर प्राधिकाऱ्यांकडून विशेष अधिकार प्रदानाद्वारे प्राधिकृत केलेले अधिकारी'' हे शब्द जादा दाखल करण्यात आले.

[१३] ''चौकशी प्राधिकरण'' या शब्दांऐवजी 'चौकशी प्राधिकारी' असे शब्द दाखल करण्यात आले.

[१४] ''प्राधिकरण'' या शब्दाऐवजी '' प्राधिकारी' हा शब्द दाखल करण्यात आला.

[१५] ''टीप:-यामध्ये प्रमुख अधिकारी (चौकशी), तसेच महानगरपालिका अधिकारी नसलेला परंतु एखाद्या प्रकरणी चौकशी करण्याकरिता महानगरपालिका आयुक्तांनी विशेष अधिकाराद्वारे नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांचा समावेश होतो'' हा मजकूर नव्याने समाविष्ट करण्यात आला.

[१६] **नवीन तरतूदः-**

(आय) ''**खात्यांतर्गत चौकशी**'' याचा अर्थ महानगरपालिका कर्मचारी नियमभंग, शिस्तभंग, निष्काळजीपणा, अयोग्यता, कर्तव्यच्युती किंवा गैरवर्तन यामध्ये दोषी आहे किंवा कसे, हे निश्चित करण्याकरिता आणि अशा परिस्थितीमध्ये सिध्द झालेल्या आरोपांकरिता ठोठाविण्यात यावयाच्या शिक्षेचे स्वरूप व परिमाण निश्चित करण्याकरिता करावयाची चौकशी.

**टीपः-(१)** महानगरपालिका कर्मचाऱ्यावर आरोप ठेवण्याकरिता सकृतदर्शनी प्रकरण आहे किंवा कसे, हे अजमावण्याकरिता करण्यात आलेली प्राथमिक चौकशी ही खात्यांतर्गत चौकशी ठरत नाही.

**टीपः-(२)** गैरवर्तणूकीचा अहवाल महानगरपालिका प्राधिकाऱ्यांनी पाठविलेल्या प्रकरणी सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मंजूरीने करावयाचा तपास / प्राथमिक चौकशी प्रकरणे वगळता बाह्य व्यक्तींकडून आलेल्या तक्रारीचा तपास / प्राथमिक चौकशीचे आदेश देताना तक्रारदाराने तक्रारीला दुजोरा देणारा किमान प्रथमदर्शनी पुरावा जोडला आहे, याची खात्री करण्यात यावी.

[१७](ज) ''**जबर शिक्षा**'' याचा अर्थ, नियम ५ च्या पोट-नियम [१८](ब) च्या बाबी (एक) ते (तीन) (दोन्ही धरुन) [१९]त्या खालील टीप (१) व (२) विचारात घेऊन, यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षांपैकी कोणतीही शिक्षा, असा आहे.

---

[१६] ''नवीन तरतूद:-(आय) ''खात्यांतर्गत चौकशी'' याचा अर्थ महानगरपालिका कर्मचारी नियमभंग, शिस्तभंग, निष्काळजीपणा, अयोग्यता, कर्तव्यच्युती किंवा गैरवर्तन यामध्ये दोषी आहे किंवा कसे, हे निश्चित करण्याकरिता आणि अशा परिस्थितीमध्ये सिध्द झालेल्या आरोपांकरिता ठोठाविण्यात यावयाच्या शिक्षेचे स्वरूप व परिमाण निश्चित करण्याकरिता करावयाची चौकशी'' यासह त्याखालील टीप:-(१) व टीप:-(२) हा मजकूर नव्याने दाखल करण्यात आला.

[१७] ''अनु.क्र.(आय) ऐवजी अनु.क्र.(ज)'' असा बदल करण्यात आला.

[१८] '' पोटनियम (१) च्या बाबी (सात) ते (नऊ)'' या शब्दांऐवजी ''पोटनियम (ब) च्या बाबी (एक) ते (तीन)'' हे शब्द दाखल करण्यात आले.

[१९] ''त्या खालील टीप (१) व (२) विचारात घेऊन'' हे शब्द नव्याने दाखल करण्यात आंले.

[२०](ख) ''**किरकोळ शिक्षा**'' याचा अर्थ, नियम क्र.५च्या पोट-नियम [२१](अ) च्या बाबी (एक) ते (चार) (दोन्ही धरुन) यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षांपैकी कोणतीही शिक्षा, असा आहे.

[२२](ल) ''**सेवा**'' **याचा अर्थ,** बृहन्मुंबई महानगरपालिकेची नागरी सेवा, असा आहे.

[२३](म) ''**राज्य**'' याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य, असा आहे.

**३. प्रयुक्ती:-**

(अ) बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियमांद्वारे किंवा या नियमान्वये अन्यथा तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त हे नियम, (या नियमांतील तरतुदींशी विसंगत नसणाऱ्या व या नियमांमध्ये समाविष्ट केलेल्या बाबींच्या संबंधातील कोणतेही नियम व आदेशसुध्दा) या नियमांच्या नियम २(इ) मध्ये व्याख्या केलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्व कर्मचाऱ्यांना लागू होतील.

(ब) ज्या व्यक्तीला हे नियम लागू होतात अशी कोणतीही व्यक्ती विशिष्ट सेवेतील आहे किंवा कसे, याबाबत कोणताही संदेह उत्पन्न झाला तर ही बाब महानगरपालिका आयुक्तांकडे निर्देशित केली जाईल व महानगरपालिका आयुक्त त्यावर निर्णय देतील.

---

[२०] ''अनु.क्र.(ज) ऐवजी अनु.क्र.(ख)'' असा बदल करण्यात आला.

[२१] ''पोटनियम(१) च्या बाबी (एक) ते (चार)'' या शब्दांऐवजी ''पोटनियम (अ) च्या बाबी (एक) ते (चार)'' हे शब्द दाखल करण्यात आले.

[२२] ''अनु.क्र.(ख) ऐवजी अनु.क्र.(ल)'' असा बदल करण्यात आला. तथापि, मजकूरामध्ये कोणताही बदल नाही.

[२३] ''अनु.क्र.(ल) ऐवजी अनु.क्र.(म)'' असा बदल करण्यात आला. तथापि, मजकूरामध्ये कोणताही बदल नाही.

## भाग दोन - (अ) निलंबन

**४. (अ) निलंबन:-**

(१) नियुक्ती [२४]प्राधिकारी किंवा नियुक्ती [२५]प्राधिकारी त्या प्राधिकरणाच्या नियंत्रणाखाली आहे, असे कोणतेही प्राधिकरण किंवा शिस्तभंगविषयक [२६]प्राधिकारी किंवा महानगरपालिका आयुक्तांनी यासंबंधात सर्वसाधारण व विशेष आदेशाद्वारे अधिकार प्रदान केलेले अन्य कोणतेही [२७]प्राधिकारी, महानगरपालिका कर्मचाऱ्याला -

(अ) ज्या बाबतीत त्यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक [२८]कारवाई करण्याचे योजिले असेल किंवा अशी [२९]कारवाई प्रलंबित असेल, किंवा

(ब) ज्या बाबतीत तो कर्मचारी महानगरपालिकेच्या कामकाजाच्या दृष्टीने बाधक ठरणाऱ्या कार्यामध्ये गुंतलेला आहे, असे पूर्वोक्त [३०]प्राधिकाऱ्याचे मत असेल किंवा,

(क) ज्या बाबत त्याच्याविरुध्द कोणत्याही फौजदारी गुन्ह्याच्या संबंधात खटल्याचे अन्वेषण, चौकशी किंवा न्यायचौकशी चालू असेल, अशा बाबतीत निलंबनाधीन ठेवू शकेल.

परंतु नियुक्ती प्राधिकाऱ्यापेक्षा खालच्या दर्जाच्या प्राधिकाऱ्याने निलंबनाचा आदेश काढला असेल त्याबाबतीत अशा [३१]प्राधिकाऱ्याने ज्या परिस्थितीत प्रस्तुत आदेश काढला असेल ती परिस्थिती ते [३२]प्राधिकारी तात्काळ नियुक्ती प्राधिकाऱ्याला [३३]कळवतील [३४]आणि असे निलंबन, नियुक्ती प्राधिकाऱ्याने निलंबनाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत कायम न केल्यास संपुष्टात येईल.

---

[२४,२५,२६,२७] ''प्राधिकरण'' या शब्दाऐवजी ''प्राधिकारी'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[२८,२९] ''कार्यवाही'' या शब्दाऐवजी ''कारवाई'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[३०] ''प्राधिकरणाचे'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याचे'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[३१] ''प्राधिकरणाने' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याने'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[३२] ''प्राधिकरण'' या शब्दाऐवजी ''प्राधिकारी'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[३३] ''कळवील'' या शब्दाऐवजी ''कळवतील'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[३४] ''आणि असे निलंबन, नियुक्ती प्राधिकाऱ्याने निलंबनाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत कायम न केल्यास संपुष्टात येईल'' हा मजकूर नव्याने समाविष्ट करण्यात आला.

(२) महानगरपालिका कर्मचाऱ्याला -

(अ) फौजदारी आरोपाखाली किंवा अन्यथा अटक करुन ४८ तासाहून अधिक काळ पोलीस किंवा न्यायालयीन अभिरक्षेमध्ये ठेवले असेल तर, त्याला अटकेत ठेवल्याच्या दिनांकापासून,

(ब) तो सिध्दापराध ठरून त्याला ४८ तासांहून अधिक मुदतीच्या कारावासाची शिक्षा झाली असेल आणि अशा अपराध सिध्दीनंतर त्याला लगेच बडतर्फ केले नसेल किंवा सेवेतून काढून टाकले नसेल, [३५]**** तर त्याच्या अपराध सिध्दीच्या दिनांकापासून नियुक्ती प्राधिकरणाच्या आदेशाद्वारे निलंबनाधीन ठेवले असल्याचे मानले जाईल.

**स्पष्टीकरण**- या पोटनियमाच्या खंड(ब)मध्ये निर्देशिलेल्या ४८ तासांचा कालावधी, अपराध सिध्दीनंतर कारावासाचा आरंभ झाल्यापासून मोजला जाईल आणि या प्रयोजनासाठी, मध्यंतरीच्या कारावासाचे कोणतेही कालावधी असल्यास ते ही मोजले जातील.

(३) निलंबनाधीन महानगरपालिका कर्मचाऱ्याला दिलेली बडतर्फीची, सेवेतून काढून टाकण्याची [३६]**** शिक्षा अपिलामध्ये किंवा या नियमांखालील [३७]पुनर्विलोकनामध्ये विचारात घेतलेली नसेल (बाजूस ठेवली असेल Set aside) आणि पुढील चौकशीसाठी किंवा कार्यवाहीसाठी किंवा अन्यथा कोणत्याही निदेशासह प्रकरण पुढे पाठविलेले असेल त्या बाबतीत, त्या कर्मचाऱ्याच्या निलंबनाचा आदेश, त्याच्या बडतर्फीच्या, सेवेतून काढून टाकण्याच्या [३८]**** संबंधातील मूळ आदेश काढल्याच्या तारखेला आणि तेव्हापासून अंमलात असल्याचे मानले जाईल आणि पुढील आदेश देण्यात येईपर्यंत तो अंमलात राहिल.

---

[३५] ''किंवा सक्तीने सेवेतून सेवानिवृत्त केले नसेल'' हा मजकूर वगळण्यात आला.

[३६] ''किंवा सक्तीने सेवानिवृत्त करण्याची'' हा मजकूर वगळण्यात आला.

[३७] ''पुनर्रक्षणामध्ये'' या शब्दाऐवजी ''पुनर्विलोकनामध्ये'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[३८] ''किंवा सक्तीने सेवानिवृत्त करण्याच्या'' हा मजकूर वगळण्यात आला.

(४) महानगरपालिका कर्मचाऱ्याला दिलेली बडतर्फीची, सेवेतून काढून टाकण्याची [३९]**** शिक्षा न्यायालयाच्या निर्णयामुळे किंवा निर्णयाद्वारे [४०]विचारात घेतली जात नसेल किंवा रद्दबातल असल्याचे जाहीर केले जात असेल किंवा रद्दबातल ठरत असेल आणि शिस्तभंगविषयक [४१]प्राधिकाऱ्याने प्रकरणाची परिस्थिती विचारात घेऊन, मूळात ज्या आरोपावरुन त्याला बडतर्फीची, सेवेतून काढून टाकण्याची [४२]**** शिक्षा देण्यात आली होती, त्या आरोपाबाबत पुढील चौकशी करण्याचा निर्णय घेतला असेल त्या बाबतीत, नियुक्ती [४३]प्राधिकाऱ्याने काढलेल्या बडतर्फीच्या, सेवेतून काढून टाकण्याच्या [४४]**** मूळ आदेशाच्या तारखेपासून महानगरपालिका कर्मचारी निलंबनाधीन असल्याचे मानले जाईल आणि पुढील आदेश देण्यात येईपर्यंत तो निलंबनाधीन असल्याचे चालू राहील.

परंतु, ते प्रकरण गुणवत्तेनुसार न तपासता केवळ तांत्रिक बाबींवरुन न्यायालयाने आदेश दिलेला असेल त्याबाबतीत, तांत्रिक बाब पूर्ण केल्याखेरीज अशी पुढील चौकशी करण्याचा आदेश देण्यात येणार नाही.

(५)(अ) या नियमान्वये, दिलेला किंवा देण्यात आला असल्याचे मानलेला निलंबनाचा आदेश, त्यात बदल करण्यात किंवा तो रद्द करण्यास सक्षम असणाऱ्या [४५]प्राधिकाऱ्याकडून तसे करण्यात येईपर्यंत अंमलात राहील.

---

[३९] ''किंवा सक्तीने सेवानिवृत्त करण्याची'' हा मजकूर वगळण्यात आला.

[४०] ''रद्द करण्यात आली असेल/बाजूस ठेवली जात असेल किंवा अवैध असल्याचे जाहीर केले जात असेल किंवा अवैध ठरत असेल'' याऐवजी ''विचारात घेतली जात नसेल किंवा रद्दबातल असल्याचे जाहीर केले जात असेल किंवा रद्दबातल ठरत असेल'' हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४१] ''प्राधिकरणाने'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याने'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[४२] ''किंवा सक्तीने सेवानिवृत्त करण्याची'' हा मजकूर वगळण्यात आला.

[४३] ''प्राधिकरणाने'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याने'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[४४] ''किंवा सक्तीने सेवानिवृत्त करण्याच्या'' हा मजकूर वगळण्यात आला.

[४५] ''प्राधिकरणाकडून'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याकडून'' हा शब्द दाखल करण्यात आला.

(ब) महानगरपालिका कर्मचाऱ्याला निलंबित केले असेल किंवा त्याला निलंबित करण्यात आल्याचे मानले जात असेल (मग ते निलंबन शिस्तभंगविषयक [४६]कारवाईच्या संबंधात असो किंवा अन्यथा असो) आणि ते निलंबन चालू असताना त्यांच्याविरुध्द अन्य कोणतीही शिस्तभंगविषयक [४७]कारवाई सुरू करण्यात आली असेल तेव्हा, त्याला निलंबनाधीन ठेवण्यास सक्षम असणारे [४८]प्राधिकारी त्या संबंधातील कारणे लेखी नमूद करून अशा सर्व किंवा अशी कोणतीही [४९]कारवाई संपेपर्यंत, असा महानगरपालिका कर्मचारी निलंबनाधीनच राहील असा [५०]निर्देश देतील.

(क) या नियमान्वये दिलेला किंवा देण्यात आला असल्याचे मानलेला निलंबनाचा आदेश ज्या [५१]प्राधिकाऱ्याने दिला असेल किंवा ज्या [५२]प्राधिकाऱ्याकडून देण्यात आला असल्याचे मानण्यात आले असेल त्या [५३]प्राधिकाऱ्याला किंवा असे [५४]प्राधिकारी ज्याच्या नियंत्रणाखाली [५५]असतील अशा [५६]प्राधिकाऱ्याला त्या आदेशात फेरबदल करता येतील किंवा तो रद्द करता येईल.

परंतु जेथे महानगरपालिका कर्मचाऱ्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला असेल तेथे, या नियमान्वये देण्यात आला असल्याचे मानलेल्या निलंबनाच्या आदेशात फेरफार करण्यापूर्वी वा तो रद्द करण्यापूर्वी, असा आदेश ज्या [५७]प्राधिकाऱ्याने दिला असेल किंवा ज्या [५८]प्राधिकाऱ्याकडून देण्यात आला असल्याचे मानण्यात आले असेल तो [५९]प्राधिकारी किंवा असे [६०]प्राधिकारी ज्याच्या नियंत्रणाखाली [६१]असतील असे [६२]प्राधिकारी, महानगरपालिकेने या प्रयोजनार्थ गठीत केलेल्या निलंबन आढावा समितीची शिफारस प्राप्त करून [६३]घेतील.

---

[४६] ''कार्यवाहीच्या'' या शब्दाऐवजी ''कारवाईच्या'', [४७] ''कार्यवाही'' या शब्दाऐवजी ''कारवाई'' [४८]''प्राधिकरण'' या शब्दाऐवजी ''प्राधिकारी'', [४९] ''कार्यवाही'' या शब्दाऐवजी ''कारवाई'', [५०] ''निदेश देतील'' या शब्दांऐवजी ''निर्देश देतील'', [५१]''प्राधिकरणाने'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याने'', [५२]''प्राधिकरणाकडून'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याकडून'', [५३]''प्राधिकरणाला'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याला'', [५४]''प्राधिकरण'' या शब्दाऐवजी ''प्राधिकारी'', [५५]''असेल'' या शब्दाऐवजी ''असतील'' , [५६]''प्राधिकरणाला'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याला'' , [५७]''प्राधिकरणाने'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याने'', [५८]''प्राधिकरणाकडून'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याकडून'', [५९]''प्राधिकरण'' या शब्दाऐवजी ''प्राधिकारी'', [६०]''प्राधिकरण'' या शब्दाऐवजी ''प्राधिकारी''. [६१]''असेल'' या शब्दाऐवजी ''असतील'', [६२] ''प्राधिकरण'' या शब्दाऐवजी ''प्राधिकारी'' व [६३] ''घेईल'' या शब्दाऐवजी ''घेतील'' हे शब्द दाखल करण्यात आले.

**स्पष्टीकरण-** फौजदारी/लाचलुचपत प्रतिबंधक प्रकरणांमध्ये निलंबित कर्मचाऱ्यांचे निलंबनाचे पुनर्विलोकन महानगरपालिका आयुक्त किंवा त्यांनी अधिकृत केलेले अधिकारी / प्राधिकारी करू शकतील. सदर पुनर्विलोकन समितीची बैठक दर सहा महिन्यांनी आयोजित करण्यात येईल. तसेच खातेप्रमुख यांनी एखादया विशिष्ट प्रकरणामध्ये काही अवाजवी कारणे निदर्शनास आणून दिल्यास त्या अनुषंगाने महानगरपालिका आयुक्त किंवा त्यांनी अधिकृत केलेले अधिकारी / प्राधिकारी अशा प्रकरणांमध्ये निलंबित कर्मचाऱ्यांचे निलंबनाचे पुनर्विलोकन करून निलंबन मागे घेऊ शकतील.

[६४]***फौजदारी प्रकरणामध्ये लोकसेवकांविरुध्द सक्षम न्यायालयामध्ये खटला दाखल करण्यासाठी मंजूरी देण्यापूर्वी, अन्वेषण प्राधिकाऱ्याने / प्राधिकरणाने सादर केलेल्या दस्तऐवजाच्या आधारे, लोकसेवकाकडून कर्तव्यात कसूर घडली असून / गैरकृत्य घडले असून, खटला दाखल करण्याकरिता सकृतदर्शनी पुरेसा पुरावा आहे, असे मत झाल्यास महानगरपालिका आयुक्त खटला दाखल करण्यास मंजूरी देऊ शकतील.***

***अस्तित्वात असलेले कायदे व नियमांनुसार विहित मुदतीत पोलिस प्राधिकरणाचे अन्वेषण पूर्ण झाले नसेल किंवा आरोपपत्र दाखल झाले नसले तरीही त्याचे पुनर्विलोकन करु शकतील.***

***पोलिस प्राधिकरणाचे अन्वेषण पूर्ण झाले असेल किंवा आरोपपत्र दाखल झाले असेल, अत्यंत गंभीर फौजदारी प्रकरणाव्यतिरिक्त तर त्याबाबतच्या पुराव्याच्या अनुषंगाने महापालिकेचा थेट किंवा अप्रत्यक्षरित्या असलेले संबंध, त्याचे गांभीर्य, निलंबित कर्मचाऱ्याचा पूर्णतः वैयक्तिक आहे किंवा कसे, या अनुषंगाने पुनर्विलोकन करु शकतील.***

---

[६४] ''फौजदारी प्रकरणांमध्ये लोकसेयक हयाबाबत हयांच्याविरुध्द न्यायालयामध्ये गुन्हा दाखल करताना फौजदारी पुराव्याच्या अनुषंगाने महानगरपालिका आयुक्त मंजूरी देऊ शकतील. तथापि त्याबाबत महापालिकेच्या कर्तव्याची कसूर याचा पुरावा फौजदारी प्रकरणामध्ये कितपत लागू होतो याची छाननी करुन तशी मंजूरी देण्यात येईल'' याऐवजी ''फौजदारी प्रकरणामध्ये लोकसेवकांविरुध्द सक्षम न्यायालयामध्ये खटला दाखल करण्यासाठी मंजूरी देण्यापूर्वी, अन्वेषण प्राधिकाऱ्याने / प्राधिकरणाने सादर केलेल्या दस्तऐवजाच्या आधारे, लोकसेवकाकडून कर्तव्यात कसूर घडली असून / गैरकृत्य घडले असून, खटला दाखल करण्याकरिता सकृतदर्शनी पुरेसा पुरावा आहे, असे मत झाल्यास महानगरपालिका आयुक्त खटला दाखल करण्यास मंजूरी देऊ शकतील'' हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

## भाग दोन – (ब) प्राथमिक चौकशी

**४.(ब) प्राथमिक चौकशी:-**

(१) खात्यांतर्गत संक्षिप्त/सर्वकष चौकशी आदेशित करण्यापूर्वी संबंधित प्रकरणात प्राथमिक चौकशीची कार्यवाही करणे आवश्यक, [६५]इष्ट आहे किंवा नाही याचा निर्णय शिस्तभंगविषयक [६६]प्राधिकारी घेऊ शकतील.

(२) महानगरपालिका कर्मचाऱ्याविरूध्द ठेवण्यात येणारे दोषारोप जर गंभीर स्वरुपाचे असतील आणि ते कर्मचाऱ्याविरूध्द सिध्द झाल्यास त्याला ''जबर शिक्षा'' ठोठावल्या जाऊ शकतात, अशी शिस्तभंगविषयक [६७]प्राधिकाऱ्याची धारणा झाली असेल तर, अशा प्रकरणात प्राथमिक चौकशीची कार्यवाही करणे योग्य होईल.

(३) जर एखादया प्रकरणामध्ये पोलिसांमार्फत चौकशी सुरू असेल तर ही चौकशी प्रक्रीया प्राथमिक चौकशीच्या समकक्ष मानली जाऊ शकते. अशा प्रकरणात नव्याने प्राथमिक चौकशी करण्याची आवश्यकता नाही.

(४) [६८]प्राथमिक चौकशी महानगरपालिका आयुक्तांनी किंवा शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्यांनी प्राधिकृत केलेल्या चौकशी प्राधिकाऱ्यांनी केली पाहिजे.

---

[६५] ''इष्ट'' हा शब्द नव्याने दाखल करण्यात आला.

[६६] ''प्राधिकरण'' या शब्दाऐवजी ''प्राधिकारी'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[६७] ''प्राधिकरणाची'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याची'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[६८] ''प्राथमिक चौकशी ही महानगरपालिका आयुक्त किंवा शिस्तभंगविषयक प्राधिकरणाने नियुक्त केलेले चौकशी प्राधिकरण करू शकते'' याऐवजी ''प्राथमिक चौकशी महानगरपालिका आयुक्तांनी किंवा शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्यांनी प्राधिकृत केलेल्या चौकशी प्राधिकाऱ्यांनी केली पाहिजे'' हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(५) [६९]प्राथमिक चौकशी अहवाल किंवा प्रकरणामध्ये उपलब्ध झालेल्या अन्य दस्तऐवजांचे अवलोकन करून किंवा त्याचा विचार करून सक्षम प्राधिकाऱ्यांनी पुढील बाबींवर निर्णय घ्यावा:-

(अ) खात्यांतर्गत चौकशी करण्याकरिता सकृतदर्शनी प्रकरण आहे का ?

(ब) सदर प्रकरणातील महानगरपालिका कर्मचाऱ्यांना त्यांच्याविरूध्दच्या प्रस्तावित खात्यांतर्गत चौकशीसापेक्ष निलंबित करावे किंवा कसे ? आणि

(क) खात्यांतर्गत चौकशीची कारवाई न करताच संबंधित महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या सेवा समाप्त करता येतील किंवा कराव्यात किंवा कसे ?

---

[६९] ''प्राथमिक चौकशी अहवालामध्ये काढलेल्या निष्कर्षावर शिस्तभंगविषयक प्राधिकरण पुढील खात्यांतर्गत संक्षिप्त / सर्वंकष चौकशीची कार्यवाहीबाबत निर्णय घेऊ शकते'' या ऐवजी ''प्राथमिक चौकशी अहवाल किंवा प्रकरणामध्ये उपलब्ध झालेल्या अन्य दस्तऐवजांचे अवलोकन करून किंवा त्याचा विचार करून सक्षम प्राधिकाऱ्यांनी पुढील बाबींवर निर्णय घ्यावा:-

(अ) खात्यांतर्गत चौकशी करण्याकरिता सकृतदर्शनी प्रकरण आहे का ?

(ब) सदर प्रकरणातील महानगरपालिका कर्मचाऱ्यांना त्यांच्याविरूध्दच्या प्रस्तावित खात्यांतर्गत चौकशीसापेक्ष निलंबित करावे किंवा कसे ? आणि

(क) खात्यांतर्गत चौकशीची कारवाई न करताच संबंधित महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या सेवा समाप्त करता येतील किंवा कराव्यात किंवा कसे ? '' हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

## भाग तीन - शिक्षा आणि शिरत्तभंगविषयक प्राधिकरणे

**५. शिक्षाः-**

(अ) [७०]वेळोवेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतूदीना बाधा न आणता, महानगरपालिका कर्मचाऱ्याला वाजवी व पुरेशा कारणाकरिता, यात इतरत्र नमूद केलेली कार्यपध्दती अवलंबून बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ८३ (३) प्रमाणे पुढील किरकोळ शिक्षा करता येतील.

**किरकोळ स्वरूपाच्या शिक्षाः-**

(एक) ठपका ठेवणे,

(दोन) दंड (शास्ती) करणे,

(तीन) कर्मचाऱ्याच्या निष्काळजीपणामुळे किंवा त्याने आदेशाचा भंग केल्यामुळे महानगरपालिकेला झालेल्या कोणत्याही आर्थिक स्वरूपाच्या हानीची संपूर्ण रक्कम किंवा तिचा भाग त्याच्या वेतनामधून वसूल करणे,

(चार) वेतनवाढ रोखून ठेवणे (कायमस्वरुपी / हंगामी).

-----------------------------------------------------

[७०] ''वेळोवेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतूदीना बाधा न आणता, महानगरपालिका कर्मचाऱ्याला वाजवी व पुरेशा कारणाकरिता, यात इतरत्र नमूद केलेली कार्यपध्दती अवलंबून'' हा मजकूर नव्याने समाविष्ट करण्यात आला.

**(ब) जबर शिक्षा:-**

बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ८३ (१) प्रमाणे पुढील जबर शिक्षा करता येतील.

(एक) सेवेतून बडतर्फ करणे. [७१]मात्र भावी काळात महानगरपालिकेमध्ये नोकरी मिळण्याच्या दृष्टीने सर्वसाधारणपणे ही अनर्हता ठरेल.

(दोन) सेवेतून काढून टाकणे, मात्र भावी काळात महानगरपालिकेमध्ये नोकरी मिळण्याच्या दृष्टीने सर्वसाधारणपणे ही अनर्हता ठरणार नाही.

(तीन) वेतन कमी करणे किंवा पदावनत करणे.

[७२]**टीप:- (१)** विनिर्दिष्ट कालावधीकरिता वेतन समयश्रेणीतील खालच्या टप्प्यावर आणण्यात येईल आणि अशा पदावनतीच्या काळात महानगरपालिका कर्मचाऱ्याला वेतनवाढी मिळतील किंवा मिळणार नाहीत याबाबत आणि असा कालावधी समाप्त झाल्यानंतर या पदावनतीच्या परिणामी त्याच्या भावी वेतनवाढी पुढे ढकलल्या जातील किंवा नाही, याबाबतही निर्देश दिले जातील.

---

[७१] ''मात्र भावी काळात महानगरपालिकेमध्ये नोकरी मिळण्याच्या दृष्टीने सर्वसाधारणपणे ही अनर्हता ठरेल'' हे शब्द नव्याने दाखल करण्यात आले.

[७२] ''अनु.क्र.(चार) याऐवजी टीप:-(१)'' हा शब्द दाखल करण्यात आला. तथापि, मजकूरात कोणताही बदल नाही.

[७३]टीप:-(२) महानगरपालिका कर्मचाऱ्यास शिक्षेच्या आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीसाठी तो ज्या वेतन समयश्रेणीमध्ये, पदावर श्रेणीमध्ये किंवा सेवेमध्ये असेल त्यापेक्षा खालच्या वेतन समयश्रेणीमध्ये, पदावर श्रेणीमध्ये किंवा सेवेमध्ये आणणे, ज्या वेतन समयश्रेणीतून पदावरून श्रेणीमधून किंवा सेवेतून महानगरपालिका कर्मचाऱ्यास असे अवनत करण्यात आले असेल, त्या वेतन समयश्रेणीमधील, पदावरील, श्रेणीमधील किंवा सेवेतील बढतीस अशी अवनती अशा विनिर्दिष्ट कालावधीसाठी रोधक ठरेल, अशा आदेशांमध्ये तो कालावधी समाप्त झाल्यावर महानगरपालिका कर्मचाऱ्यास पूर्वीच्या वेतन समयश्रेणीत, पदावर, श्रेणीमध्ये किंवा सेवेमध्ये परत आणण्यासंबंधीच्या पुढील अटींचा समावेश असावा.

[७४]**स्पष्टीकरणः-** मात्र अशाप्रकारे खालच्या वेतनश्रेणीमध्ये, पदावर श्रेणीमध्ये किंवा सेवेत अवनत करतांना कर्मचाऱ्याची मूळ नियुक्ती ज्या पदावर झाली होती, त्यापेक्षा खालच्या पदावर त्यांना अवनत करण्यात येणार नाही.

(अ) पदावनतीच्या विनिर्दिष्ट कालावधीच्या परिणामी भावी काळातील वेतनवाढी पुढे ढकलल्या जातील किंवा कसे, व त्या कोणत्या मर्यादेपर्यंत, आणि

---

[७३] ''अनु.क्र.(पाच) याऐवजी टीप:-(२) '' हा शब्द दाखल करण्यात आला. तथापि, मजकूरात कोणताही बदल नाही.

[७४] ''स्पष्टीकरण:- मात्र अशाप्रकारे खालच्या वेतनश्रेणीमध्ये, पदावर श्रेणीमध्ये किंवा सेवेत अवनत करतांना कर्मचाऱ्याची मूळ नियुक्ती ज्या पदावर झाली होती, त्यापेक्षा खालच्या पदावर त्यांना अवनत करण्यात येणार नाही.'' असा मजकूर नव्याने समाविष्ट करण्यात आला.

(ब) महानगरपालिका कर्मचाऱ्यास त्याच्या वेतन समयश्रेणीमध्ये, पदावर श्रेणीमध्ये किंवा सेवेमध्ये मूळ सेवाजेष्ठता मिळेल किंवा कसे,

(परंतु, कोणतेही काम करण्याबद्दल किंवा ते काम करण्यापासून परावृत्त करण्याबद्दल कायदेशीर परिश्रमिकाव्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तीकडून लालूच किंवा बक्षिस म्हणून कोणतेही इनाम स्वीकारल्याचा आरोप सिध्द झाला असेल अशा प्रत्येक प्रकरणात [७५]उपरोक्त (ब) मधील (एक) किंवा (दोन) मध्ये नमूद केलेली शिक्षा देण्यात येईल.) [७६]तसेच, विवक्षित प्रकरणी न्यायालयीन निवाडयाच्या आधारे अंमलात असलेली शासनाची धोरणे (उदा. बनावट जात प्रमाणपत्र प्रकरणे) यानुसार विहित केलेल्या शिक्षा देण्यात येतील.

परंतु आणखी असे की, कोणत्याही अपवादात्मक प्रकरणात आणि लेखी नमूद केलेल्या विशेष कारणांकरिता इतर कोणत्याही शिक्षा देण्यात येतील.

[७७](क) ज्याबाबतीत पोट नियम (ब) (तीन) खालील टीप क्र.(२) विचारात घेऊन त्यामध्ये उल्लेखिलेली शिक्षा महानगरपालिका कर्मचाऱ्याला करण्यात येते, अशा बाबतीत अशी शिक्षा करणारे प्राधिकारी ज्या कालावधीसाठी कर्मचाऱ्यास पदावनत करण्यात आले असेल तो कालावधी पूर्ण होण्यापूर्वी कर्मचाऱ्याने रजेवर व्यतीत केलेला कोणताही मध्यंतरीचा कालावधी त्या पदावनतीच्या कालावधीमध्ये धरला जाणार नाही, असे त्या शिक्षेच्या आदेशामध्ये स्पष्ट करतील.

---

[७५] ''खंड (एक) किंवा (दोन) मध्ये नमूद केलेली शिक्षा देण्यात येईल'' या शब्दांऐवजी ''उपरोक्त (ब) मधील (एक) किंवा (दोन) मध्ये नमूद केलेली शिक्षा देण्यात येईल'' हे शब्द दाखल करण्यात आले.

[७६] ''तसेच, विवक्षित प्रकरणी न्यायालयीन निवाडयाच्या आधारे अंमलात असलेली शासनाची धोरणे (उदा. बनावट जात प्रमाणपत्र प्रकरणे) यानुसार विहित केलेल्या शिक्षा देण्यात येतील.

परंतु आणखी असे की, कोणत्याही अपवादात्मक प्रकरणात आणि लेखी नमूद केलेल्या विशेष कारणांकरिता इतर कोणत्याही शिक्षा देण्यात येतील.'' असा मजकूर नव्याने समाविष्ट करण्यात आला.

[७७] ''(क) ज्याबाबतीत पोट नियम (ब) (तीन) खालील टीप क्र.(२) विचारात घेऊन त्यामध्ये उल्लेखिलेली शिक्षा महानगरपालिका कर्मचाऱ्याला करण्यात येते, अशा बाबतीत अशी शिक्षा करणारे प्राधिकारी ज्या कालावधीसाठी कर्मचाऱ्यास पदावनत करण्यात आले असेल तो कालावधी पूर्ण होण्यापूर्वी कर्मचाऱ्याने रजेवर व्यतीत केलेला कोणताही मध्यंतरीचा कालावधी त्या पदावनतीच्या कालावधीमध्ये धरला जाणार नाही, असे त्या शिक्षेच्या आदेशामध्ये स्पष्ट करतील'' हा मजकूर दाखल करण्यात आला.

**स्पष्टीकरण**- या नियमांच्या अर्थांतर्गत पुढील गोष्टी या शिक्षा ठरणार नाहीत, त्या अशा-

(एक) महानगरपालिका कर्मचारी ज्या सेवेत असेल ती सेवा किंवा तो धारण करीत असलेले पद ज्या नियमांद्वारे किंवा आदेशाद्वारे विनियमित केले जात असेल त्या नियमांनुसार व आदेशानुसार किंवा त्याच्या नियुक्तीच्या शर्तीनुसार कोणतीही विभागीय परीक्षा [७८]किंवा अन्य विहित परीक्षा (उदा. मराठी भाषा परीक्षा, संगणक अर्हता परीक्षा) उत्तीर्ण न झाल्याबद्दल वेतनवाढी रोखून ठेवणे.

[७९]****

[८०](दोन) महानगरपालिका कर्मचाऱ्याच्या प्रकरणाचा विचार केल्यानंतर तो त्याच्या वर्तणूकीशी संबंधित नसणाऱ्या प्रशासकीय बाबींच्या आधारे ज्या सेवेत, श्रेणीत किंवा पदावर बढती मिळवण्यास पात्र ठरला असता त्या सेवेत, श्रेणीत किंवा पदावर मग ती बढती कायम किंवा स्थानापन्न असो बढती न देणे.

[८१](तीन) उच्च सेवेत, श्रेणीत किंवा पदावर स्थानापन्न या नात्याने काम करणाऱ्या महानगरपालिका कर्मचाऱ्याला, तो अशा उच्च सेवेत, श्रेणीत किंवा पदावर काम करण्यास अयोग्य आहे. या कारणावरुन किंवा त्याच्या वर्तणूकीशी संबंधित नसणाऱ्या कोणत्याही प्रशासकीय कारणावरुन निम्न सेवेत, श्रेणीत किंवा पदावर पदावनत करणे.

---

[७८] ''(किंवा हिंदी किंवा मराठी भाषा परीक्षा)'' या शब्दांऐवजी ''किंवा अन्य विहित परीक्षा (उदा. मराठी भाषा परीक्षा, संगणक अर्हता परीक्षा)'' हे शब्द दाखल करण्यात आले.

[७९] ''(दोन) महानगरपालिका कर्मचारी दक्षतारोध पार करण्यास अयोग्य असल्याच्या कारणास्तव वेतन समयश्रेणीतील दक्षतारोधावर त्याची वेतनवाढ थांबवणे'' हा मजकूर वगळण्यात आला.

[८०] ''अनु.क्र.(तीन) ऐवजी अनु.क्र.(दोन)'' असा बदल करण्यात आला. तथापि, मजकूरात कोणताही बदल नाही.

[८१] ''अनु.क्र.(चार) ऐवजी अनु.क्र.(तीन)'' असा बदल करण्यात आला. तथापि, मजकूरात कोणताही बदल नाही.

[८२](चार) अन्य कोणत्याही सेवेत, श्रेणीत किंवा पदावर परिविक्षाधीन नियुक्त केलेल्या महानगरपालिका कर्मचाऱ्याला त्याच्या नियुक्तीच्या अटींनुसार किंवा अशा परिविक्षेचे नियंत्रण करणारे नियम व आदेश यानुसार परिविक्षाकाळामध्ये किंवा परिविक्षाकाळाच्या अखेरीस त्याच्या कायम सेवेत, श्रेणीत किंवा पदावर पदावनत करणे.

[८३](पाच) महानगरपालिकेकडून किंवा त्याच्या नियंत्रणाखालील कोणत्याही प्राधिकरणाकडून ज्याच्या सेवा उसन्या घेण्यात आल्या होत्या त्या महानगरपालिकेकडे किंवा प्राधिकरणाकडे त्या महानगरपालिका कर्मचाऱ्याच्या सेवा सुपूर्द करुन अन्य कर्मचाऱ्याच्या सेवा उपलब्ध करून घेणे.

[८४](सहा) महानगरपालिका कर्मचाऱ्याचा नियतसेवावधी किंवा सेवानिवृत्ती या संबंधीच्या तरतूदीनुसार त्याला सक्तीने सेवानिवृत्त करणे.

[८५](सात) (अ) परिविक्षाधीन नियुक्ती केलेल्या महानगरपालिका कर्मचाऱ्याची सेवा, त्याच्या परिविक्षाकाळामध्ये किंवा त्यांच्या अखेरीस त्याच्या नियुक्तीच्या अटीनुसार किंवा अशा परिविक्षेचे नियंत्रण करणारे नियम व आदेश यानुसार समाप्त करणे, किंवा

---

[८२] ''अनु.क्र.(पाच) ऐवजी अनु.क्र.(चार)'' असा बदल करण्यात आला. तथापि, मजकूरात कोणताही बदल नाही.

[८३] ''अनु.क्र.(सहा) ऐवजी अनु.क्र.(पाच)'' असा बदल करण्यात आला. तथापि, मजकूरात कोणताही बदल नाही.

[८४] ''अनु.क्र.(सात) ऐवजी अनु.क्र.(सहा)'' असा बदल करण्यात आला. तथापि, मजकूरात कोणताही बदल नाही.

[८५] ''अनु.क्र.(आठ)(अ) ऐवजी अनु.क्र.(सात)(अ)'' असा बदल करण्यात आला. तथापि, मजकूरात कोणताही बदल नाही.

(ब) अस्थायी महानगरपालिका कर्मचाऱ्याची सेवा, त्याच्या वर्तणूकीशी संबंधित नसलेल्या कारणावरुन समाप्त करणे, किंवा

(क) करारानुसार नियुक्त केलेल्या मनपा कर्मचाऱ्याची सेवा, अशा कराराच्या अटीनुसार समाप्त करणे.

[८६](२)****

**६. शिस्तभंगविषयक प्राधिकारी:-**

महानगरपालिका आयुक्त किंवा महानगरपालिका आयुक्त यांनी अधिकृत केलेले प्राधिकारी कोणत्याही महानगरपालिका कर्मचाऱ्याला, नियम क्र.५ (अ) व ५ (ब) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षांपैकी कोणतीही शिक्षा करू शकतील. परंतु कार्यकारी अभियंता किंवा तत्सम अधिकारीच्या वेतनश्रेणीत व त्यावरील वेतनश्रेणीतील कर्मचाऱ्यांना जबर शिक्षा महानगरपालिकेच्या मंजूरीने ठोठविणे [८७]बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम कलम ८३(१)च्या तरतूदीनुसार आवश्यक आहे.

**७. कार्यवाही सुरू करणारा प्राधिकारी:-**

(१) महानगरपालिका आयुक्तांना किंवा त्यांनी सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे अधिकार प्रदान केलेल्या अन्य कोणत्याही प्राधिकारी यास -

(अ) कोणत्याही महानगरपालिका कर्मचाऱ्यांविरुध्द शिस्तभंगविषयक [८८] कारवाई सुरू करता येईल.

---

[८६] ''(२) ज्याबाबतीत पोट-नियम (१)च्या बाब (पाच) व (सहा) मध्ये उल्लेखिलेली शिक्षा महानगरपालिका कर्मचाऱ्याला करण्यात येते अशा बाबतीत अशी शिक्षा करणारे प्राधिकरण ज्या कालावधीसाठी कर्मचाऱ्यास पदावनत करण्यात आले असेल तो कालावधी पूर्ण होण्यापूर्वी कर्मचाऱ्याने रजेवर व्यतीत केलेला कोणताही मध्यंतरीचा कालावधी त्या पदावनतीच्या कालावधीमध्ये धरला जाणार नाही असे त्या शिक्षेच्या आदेशामध्ये स्पष्ट करील'' हा मजकूर वगळण्यात आला.

[८७] ''बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम कलम ८३(१)च्या तरतूदीनुसार'' हे जादा शब्द दाखल करण्यात आले .

[८८] ''कार्यवाही'' या शब्दाऐवजी ''कारवाई'' हा शब्द दाखल करण्यात आला.

(ब) या नियमान्वये ज्या महानगरपालिका कर्मचाऱ्याला नियम क्र.५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षांपैकी कोणतीही शिक्षा देण्यास जे शिस्तभंगविषयक [८९]प्राधिकारी सक्षम [९०]असतील, त्या शिस्तभंगविषयक [९१]प्राधिकाऱ्यास अशा कोणत्याही महानगरपालिका कर्मचाऱ्यांविरुध्द शिस्तभंगाची [९२]कारवाई सुरू करण्याचा निदेश देता येईल.

(क) शिस्तभंगविषयक [९३]प्राधिकाऱ्याने नियम क्र.८ च्या पोट-नियम २ अन्वये नियुक्त केलेल्या चौकशी अधिकारी किंवा [९४]प्राधिकाऱ्याकडील प्रलंबित चौकशी प्रकरण, वेळेवर पूर्ण करणे आवश्यक आहे. ह्याबाबत त्याचे समाधान झाले असेल तर, असे प्रलंबित चौकशी प्रकरण, इतर कोणत्याही चौकशी अधिकारी किंवा [९५]प्राधिकाऱ्याकडे हस्तांतरित करण्याचे निर्देश देऊ शकेल.

(२) ज्या महानगरपालिका कर्मचाऱ्यास नियम क्र.५ (अ) व ५ (ब) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षांपैकी कोणतीही शिक्षा करण्यास सक्षम असणारे शिस्तभंगविषयक [९६]प्राधिकारी अशा कोणत्याही महानगरपालिका कर्मचाऱ्याविरुध्द शिस्तभंगविषयक [९७]कारवाई सुरू करू [९८]शकतील.

[९९] **स्पष्टीकरण-******

---

[८९] ''प्राधिकरण'' या शब्दाऐवजी ''प्राधिकारी'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[९०] ''असेल'' या शब्दाऐवजी ''असतील'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[९१] ''प्राधिकरणास'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्यास'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[९२] ''कार्यवाही'' या शब्दाऐवजी ''कारवाई'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[९३] ''प्राधिकरणाने'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याने'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[९४] ''प्राधिकरणाकडील'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याकडील'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[९५] ''प्राधिकरणाकडे'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याकडे'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[९६] ''प्राधिकरण'' या शब्दाऐवजी ''प्राधिकारी'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[९७] ''कार्यवाही'' या शब्दाऐवजी ''कारवाई'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[९८] ''शकेल'' या शब्दाऐवजी ''शकतील'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[९९] ''**स्पष्टीकरण-** तीन किंवा त्यापेक्षा अधिक वेतनवाढ रोखून धरणे व जबर शिक्षेचे आदेश महानगरपालिका आयुक्त किंवा महानगरपालिका आयुक्तांनी सदरबाबत अधिकृत केलेले विशिष्ट अधिकारी / प्राधिकारी यांच्या पूर्वमंजूरीशिवाय ठोठावता येणार नाही.'' हा मजकूर वगळण्यात आला आहे.

## भाग चार - शिक्षा करण्याबाबतची कार्यपध्दती

**८. जबर शिक्षा करण्याबाबतची कार्यपध्दती [१००](खात्यांतर्गत सर्वंकष चौकशी):-**

(१) शक्य असेल तेथवर, या [१०१]नियमामध्ये आणि नियम क्र.९ मध्ये तरतूद केलेल्या पद्धतीने चौकशी केल्याशिवाय, महानगरपालिका अधिनियमामध्ये तरतूद केलेल्या पद्धतीने चौकशी केल्याशिवाय, कोणतीही जबर शिक्षा ठोठावणारा आदेश काढण्यात येणार नाही.

(२) महानगरपालिका कर्मचाऱ्यांविरूध्द केलेल्या, गैरवर्तणूक किंवा गैरवर्तनाच्या कोणत्याही आरोपाच्या खरेपणाची चौकशी करण्यास पुरेसा आधार आहे, असे जेव्हा शिस्तभंगविषयक [१०२]प्राधिकाऱ्याचे मत असेल तेव्हा त्या आरोपाचा खरेपणा पडताळण्यासाठी ते [१०३]प्राधिकारी स्वत: चौकशी करू [१०४]शकतील किंवा तसे करण्यासाठी यथास्थिती, या नियमान्वये एखाद्या चौकशी अधिकाऱ्याची किंवा चौकशी समितीची नियुक्ती करू [१०५]शकतील.

परंतु, कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई, निवारण) कायदा, २०१३ या अंतर्गत लैंगिक छळवादाची तक्रार असेल, तर अशा तक्रारीची चौकशी करण्यासाठी प्रत्येक विभागात किंवा कार्यालयात गठित करण्यात आलेली तक्रार निवारण समिती, या नियमांच्या प्रयोजनासाठी शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्याने नियुक्त केलेली चौकशी प्राधिकरण असल्याचे मानण्यात येईल आणि जर लैंगिक

---

[१००] ''(खात्यांतर्गत सर्वंकष चौकशी)'' हे शब्द दाखल करण्यात आले.

[१०१] ''नियमान्वये'' या शब्दाऐवजी ''नियमामध्ये'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[१०२] ''प्राधिकरणाचे''या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याचे'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[१०३] ''प्राधिकरण'' या शब्दाऐवजी ''प्राधिकारी'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[१०४] [१०५] ''शकेल' या शब्दाऐवजी ''शकतील'' हा शब्द दाखल करण्यात आला.

छळवादाच्या तक्रारीची चौकशी करण्यासाठी, तक्रार निवारण समितीकरिता स्वतंत्र कार्यपध्दती विहित केली नसेल तर, तक्रार निवारण समिती, या नियमांमध्ये घालून दिलेल्या कार्यपध्दतीनुसार, व्यवहार्य असेल तेथवर, स्वत: चौकशी करील.

**स्पष्टीकरण:-** शिस्तभंगविषयक [१०६]प्राधिकारी या नियमान्वये स्वत: चौकशी करीत [१०७]असतील त्याबाबतीत, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर, या नियमान्वये चौकशी [१०८]प्राधिकाऱ्याचा केलेला कोणताही उल्लेख हा शिस्तभंगविषयक [१०९]प्राधिकाऱ्याचा उल्लेख आहे, असा त्याचा अर्थ लावण्यात येईल.

(३) या नियमान्वये महानगरपालिका कर्मचाऱ्यांविरुध्द चौकशी करण्याचे प्रस्तावित केले असेल त्या प्रकरणी शिस्तभंगविषयक [११०]प्राधिकारी स्वत: पुढील गोष्टींचा मसुदा तयार करील किंवा करवून [१११]घेतील.

(एक) गैरवर्तणूकीच्या किंवा गैरवर्तनाच्या आरोपांचा सारांश तयार करुन दोषारोपाच्या बाबी निश्चित व सुस्पष्ट स्वरूपात मांडणे.

(दोन) दोषारोपाच्या प्रत्येक बाबीच्या पुष्ट्यर्थ गैरवर्तणूक किंवा गैरवर्तन यासंबंधीच्या आरोपांचे विवरणपत्र तयार करणे, त्यात -

(अ) महानगरपालिका कर्मचाऱ्याने दिलेली कोणतीही कबुली किंवा कबुलीजबाब यासह वस्तुस्थिती निदर्शक बाबींचे विवरण आणि,

(ब) ज्यांच्या आधारे दोषारोपाच्या बाबी सिध्द करावयाचे योजिले असेल त्या कागदपत्रांची यादी आणि ज्यांनी साक्षी दिल्या असतील त्या साक्षीदारांची यादी, या गोष्टी समाविष्ट असतील.

---

[१०६] ''प्राधिकरण'' या शब्दाऐवजी ''प्राधिकारी'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[१०७] ''असेल'' या शब्दाऐवजी ''असतील'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[१०८,१०९] ''प्राधिकरणाचा'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याचा''हा शब्द दाखल करण्यात आला.

[११०] ''प्राधिकरण'' या शब्दाऐवजी ''प्राधिकारी'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[१११] ''घेईल'' या शब्दाऐवजी ''घेतील'' हा शब्द दाखल करण्यात आला.

(४) शिस्तभंगविषयक [११२]प्राधिकारी, महानगरपालिका कर्मचाऱ्यांकडे त्यांच्यावरील दोषारोपाच्या बाबीची प्रत, गैरवर्तणूकीच्या किंवा गैरवर्तनाच्या आरोपांचे विवरणपत्र आणि ज्यांच्या आधारे दोषारोपाची प्रत्येक बाब सिध्द करावयाचे योजिले असेल त्या कागदपत्रांची यादी व साक्षीदारांची यादी [११३]देतील किंवा देण्याची व्यवस्था [११४]करतील आणि एका लेखी ज्ञापाद्वारे व त्या ज्ञापात विनिर्दिष्ट करण्यात येईल त्या कालावधीत महानगरपालिका कर्मचाऱ्याने आपले बचावाचे लेखी निवेदन आणि व्यक्तिश: निवेदन जबाब समक्ष सादर करण्याची त्याची इच्छा आहे किंवा कसे, हे नमूद करावे असे त्यास [११५]फर्मावतील.

(५)(अ) बचावाचे लेखी निवेदन मिळाल्यावर शिस्तभंगविषयक प्राधिकरण, दोषारोपांच्या ज्या बाबी कबूल केलेल्या नसतील अशा बाबीची जातीने चौकशी [११६]करतील किंवा त्या प्रयोजनासाठी चौकशी [११७]प्राधिकाऱ्याची नियुक्ती करण्याची गरज आहे असे त्यास वाटल्यास [११८]ते, पोट-कलम (२) अन्वये अशी नियुक्ती करू [११९]शकतील आणि ज्या बाबतीत महानगरपालिका कर्मचाऱ्याने आपल्या बचावाच्या लेखी निवेदनात दोषारोपांच्या सर्व बाबींची कबुली दिली असेल त्या बाबतीत शिस्तभंगविषयक [१२०]प्राधिकारी, त्यांना योग्य वाटेल तो पुरावा ग्राहय मानून प्रत्येक दोषारोपावरील आपले निष्कर्ष नमूद करुन [१२१]ठेवतील आणि या नियमांच्या नियम क्र.९ मध्ये निर्धारित केलेल्या पध्दतीने कार्यवाही [१२२]करतील.

---

[११२] ''प्राधिकरण'' या शब्दाऐवजी ''प्राधिकारी'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[११३] ''देईल'' या शब्दाऐवजी ''देतील'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[११४] ''करील'' या शब्दाऐवजी ''करतील'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[११५] ''फर्माविल'' या शब्दाऐवजी ''फर्मावतील'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[११६] ''करील'' या शब्दाऐवजी ''करतील'' [११७] ''प्राधिकरणाची'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याची'',

[११८] 'तो'' या शब्दाऐवजी ''ते'' हे शब्द दाखल करण्यात आले.

[११९] ''शकेल'' या शब्दाऐवजी ''शकतील'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[१२०] ''प्राधिकरण'' या शब्दाऐवजी ''प्राधिकारी'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[१२१] ''ठेवील'' या शब्दाऐवजी ''ठेवतील'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[१२२] ''करील'' या शब्दाऐवजी ''करतील'' हा शब्द दाखल करण्यात आला.

(ब) महानगरपालिका कर्मचाऱ्याने बचावाचे कोणतेही लेखी निवेदन सादर केलेले नसेल तर, शिस्तभंगविषयक [१२३]प्राधिकाऱ्यास स्वत: दोषारोपाची चौकशी करता येईल किंवा त्या प्रयोजनासाठी चौकशी [१२४]प्राधिकाऱ्याची नियुक्ती करणे आवश्यक आहे, असे त्यास वाटल्यास, त्या नियमांच्या पोट-नियम (२) अन्वये त्यांना तशी नियुक्ती करता येईल.

(क) ज्या बाबतीत शिस्तभंगविषयक [१२५]प्राधिकाऱ्याने चौकशी प्राधिकाऱ्याची नियुक्ती केली असेल त्याबाबतीत, शिस्तभंगविषयक प्राधिकारी आदेश काढून, दोषारोपाच्या बाबींची पुष्ट्यर्थ चौकशी प्राधिकाऱ्यापुढे प्रकरण सादर करण्यासाठी 'सादरकर्ता अधिकारी' म्हणून महानगरपालिका कर्मचारी किंवा विधीव्यवसायी यांची नेमणूक करू [१२६]शकतील.

(६) शिस्तभंगविषयक [१२७]प्राधिकारी हे ज्या बाबतीत चौकशी प्राधिकरण [१२८]नसतील त्याबाबतीत ते पुढील गोष्टी [१२९]प्राधिकाऱ्याकडे अग्रेषित [१३०]करतील.

(एक) दोषारोपाच्या प्रत्येक बाबींची प्रत आणि गैरवर्तणूकीच्या किंवा गैरवर्तनाच्या आरोपांचे विवरणपत्र,

(दोन) महानगरपालिका कर्मचाऱ्याने बचावाचे लेखी निवेदन सादर केले असल्यास त्याची प्रत,

---

[१२३] ''प्राधिकरणास'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्यास'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[१२४] ''प्राधिकरणाची'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याची'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[१२५] ''प्राधिकरणाने'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याने'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[१२६] ''शकेल'' या शब्दाऐवजी ''शकतील'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[१२७] ''प्राधिकरण'' या शब्दाऐवजी ''प्राधिकारी'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[१२८] ''नसेल'' या शब्दाऐवजी ''नसतील'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[१२९] ''प्राधिकरणाकडे '' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याकडे'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[१३०] ''करील'' या शब्दाऐवजी ''करतील'' हा शब्द दाखल करण्यात आला.

(तीन) या नियमाच्या पोट-नियम (३) मध्ये निर्दिष्ट केलेल्या साक्षीदारांनी कोणतीही निवेदने केलेली असल्यास त्याच्या प्रती,

(चार) महानगरपालिका कर्मचाऱ्याला पोट-नियम (३) मध्ये निर्दिष्ट केलेली कागदपत्रे देण्यात आली असल्याचे सिद्ध करणारा पुरावा, आणि

(पाच) सादरकर्ता अधिकाऱ्याच्या नियुक्ती आदेशाची प्रत.

(७) चौकशी प्राधिकाऱ्याला दोषारोपाच्या सर्व बाबी आणि गैरवर्तणूकीच्या किंवा गैरवर्तनाच्या आरोपांचे विवरणपत्र मिळाल्याच्या तारखेपासून, महानगरपालिका कर्मचारी याने कार्यालयीन कामकाजाच्या दहा दिवसांच्या आत, याबाबतीत चौकशी प्राधिकाऱ्याने लेखी ज्ञापाद्वारे विनिर्दिष्ट केले असेल त्या दिवशी व त्यावेळी किंवा चौकशी प्राधिकारी मुभा देईल अशा आणखी दहा दिवसांहून अधिक नसेल इतक्या पुढील कालावधीत स्वत: चौकशी प्राधिकाऱ्यासमोर हजर झाले पाहिजे.

(८) महानगरपालिका कर्मचारी आपल्या वतीने प्रकरण सादर करण्यास [१३१]पुढील (अ) आणि (ब) येथे स्पष्ट केल्यानुसार इतर कोणत्याही महानगरपालिका कर्मचाऱ्याची अथवा सेवानिवृत्त महानगरपालिका कर्मचाऱ्याची मदत घेऊ शकेल. तसेच प्रकरणाची परिस्थिती लक्षात घेऊन शिस्तभंगविषयक [१३२]प्राधिकाऱ्याने विधीव्यवसायीची मदत घेण्याची संमती दिली असल्याखेरीज या प्रयोजनासाठी विधीव्यवसायीची मदत घेऊ शकणार नाही.

---

[१३१] ''पुढील (अ) आणि (ब) येथे स्पष्ट केल्यानुसार'' हे जादा शब्द दाखल करण्यात आले.

[१३२] ''प्राधिकरणाने'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याने'' हा शब्द दाखल करण्यात आला.

(अ) महानगरपालिका कर्मचारी आपल्या वतीने प्रकरण सादर करण्यास, त्याच्या मुख्यालयातील किंवा त्या ठिकाणी चौकशी घेण्यात येईल त्या ठिकाणच्या कोणत्याही कार्यालयातील इतर कोणत्याही महानगरपालिका कर्मचाऱ्याची मदत घेऊ शकेल. परंतु, या प्रयोजनासाठी, शिस्तभंगविषयक [१३३]प्राधिकाऱ्याने नियुक्त केलेला सादरकर्ता अधिकारी हा विधीव्यवसायी असल्याखेरीज किंवा प्रकरणाची परिस्थिती लक्षात घेऊन, शिस्तभंगविषयक [१३४]प्राधिकाऱ्याने तशी संमती दिली असल्याखेरीज अन्यथा विधि व्यवसायीची मदत घेऊ शकणार नाही.

परंतु, प्रकरणाची परिस्थिती लक्षात घेऊन, आणि लेखी कारणे नमूद करुन, चौकशी प्राधिकाऱ्याने तशी संमती दिली तर, महानगरपालिका कर्मचाऱ्याला, इतर कोणत्याही ठिकाणच्या इतर कोणत्याही महानगरपालिका कर्मचाऱ्याची मदत घेता येईल.

**टीप:-** महानगरपालिका कर्मचाऱ्याला, ज्याच्याकडे या आधीच हाती घेतलेली तीन शिस्तभंगाची प्रकरणे प्रलंबित असतील, अशा इतर कोणत्याही महानगरपालिका कर्मचाऱ्याची मदत घेता येणार नाही.

(ब) महानगरपालिका कर्मचाऱ्याला, महानगरपालिका आयुक्तांनी याबाबतीत सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेल्या अशा शर्तींना अधीन राहून, त्याच्या वतीने प्रकरण सादर करण्यास सेवानिवृत्त महानगरपालिका कर्मचाऱ्याची देखील मदत घेता येईल.

---

[१३३, १३४] ''प्राधिकरणाने'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याने'' हा शब्द दाखल करण्यात आला.

(९) ज्याने आपल्या बचावाच्या लेखी निवेदनात दोषारोपाच्या एकाही बाबीसंबंधी कबुली दिली नसेल, किंवा बचावाचे कोणतेही लेखी निवेदन सादर केलेले नसेल असा महानगरपालिका कर्मचारी चौकशी [१३५]प्राधिकाऱ्यापुढे हजर होईल तेव्हा चौकशी [१३६]प्राधिकारी त्या कर्मचाऱ्याला तो दोषी आहे किंवा कसे अथवा त्याला कोणत्याही स्वरुपाचा बचाव करावयाचा आहे काय असे विचारील आणि जर दोषारोपाच्या कोणत्याही बाबीसंबंधात तो आपला गुन्हा कबूल करील तर चौकशी [१३७]प्राधिकारी त्याचा युक्तीवाद नमूद करुन ठेवील, त्या अभिलेखावर सही करील व त्यावर त्या महानगरपालिका कर्मचाऱ्याची सही घेईल.

(१०) महानगरपालिका कर्मचाऱ्याने ज्या आरोपाबाबत आपला गुन्हा कबूल केला असेल त्यासंबंधात चौकशी [१३८]प्राधिकारी, त्या आरोपाच्या सिध्दतेबाबतचे आपले निष्कर्ष विवरणासह परत पाठवील.

(११) महानगरपालिका कर्मचारी विनिर्दिष्ट कालावधीमध्ये चौकशी [१३९]प्राधिकाऱ्यासमोर उपस्थित राहण्यात कसूर करीत असेल किंवा आपली बाजू मांडण्याचे नाकारीत असेल किंवा बाजू मांडत नसेल, तर चौकशी [१४०]प्राधिकारी सादरकर्ता अधिकाऱ्यास त्याने ज्यांच्या आधारे महानगरपालिका कर्मचाऱ्यावरील दोषारोप सिध्द करावयाचे ठरविले असेल तो पुरावा सादर करण्यास भाग पाडील आणि महानगरपालिका कर्मचारी आपल्या बचावाची तयारी करण्यासाठी पुढील गोष्टी करू शकेल, अशा आदेशाची नोंद केल्यानंतर तीस दिवसांपेक्षा अधिक नसलेल्या नंतरच्या तारखेपर्यंत प्रकरण स्थगित ठेवील -

---

[१३५] ''प्राधिकरणापुढे'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्यापुढे'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[१३६, १३७, १३८] ''प्राधिकरण'' या शब्दाऐवजी ''प्राधिकारी'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[१३९] ''प्राधिकरणासमोर'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्यासमोर'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[१४०] ''प्राधिकरण'' या शब्दाऐवजी ''प्राधिकारी'' हा शब्द दाखल करण्यात आला.

(एक) आदेशाच्या तारखेपासून पाच दिवसांच्या आत किंवा चौकशी [१४१]प्राधिकारी मुभा देतील अशा, पाच दिवसांपेक्षा अधिक नसलेल्या आणखी कालावधीमध्ये या नियमाच्या पोटनियम (३) मध्ये निर्दिष्ट केलेल्या यादीमधील कागदपत्रांची तपासणी करणे,

(दोन) त्याच्या वतीने तपासणी करण्यात यावयाच्या साक्षीदाराची यादी सादर करणे.

(तीन) जी कागदपत्रे महानगरपालिकेच्या ताब्यात आहेत परंतु या नियमाच्या पोट-नियम (३) मध्ये दर्शविलेल्या यादीमध्ये ज्या कागदपत्रांचा समावेश झालेला नाही, अशा कागदपत्रांचा शोध घेणे किंवा ती सादर करणे, यासाठी आदेशापासून १० दिवसांच्या आत किंवा चौकशी [१४२]प्राधिकारी मुभा [१४३]देतील अशा १० दिवसांपेक्षा अधिक नसलेल्या नंतरच्या कालावधीमध्ये कागदपत्रांची संबद्धता नमूद करून नोटीस देणे.

(१२) या नियमाच्या पोट-नियम (३) मध्ये निर्दिष्ट केलेल्या यादीत नमूद केलेल्या साक्षीदारांच्या निवेदनाच्या प्रती पुरविण्याबाबत महानगरपालिका कर्मचाऱ्याने तोंडी किंवा लेखी विनंती केली असेल तर, अशा बाबतीत चौकशी [१४४]प्राधिकारी शक्य तितक्या लवकर आणि कोणत्याही परिस्थितीत शिस्तभंगविषयक [१४५]प्राधिकाऱ्याच्यावतीने साक्षीदारांची तपासणी सुरू होण्यापूर्वी त्याला अशा प्रती [१४६]पुरवतील.

---

[१४१,१४२] ''प्राधिकरण'' या शब्दाऐवजी ''प्राधिकारी'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[१४३] ''देईल'' या शब्दाऐवजी ''देतील'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[१४४] ''प्राधिकरण'' या शब्दाऐवजी ''प्राधिकारी'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[१४५] ''प्राधिकरणाच्यावतीने'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याच्यावतीने'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[१४६] ''पुरवील'' या शब्दाऐवजी ''पुरवतील'' हा शब्द दाखल करण्यात आला.

(१३) ज्या बाबतीत चौकशी [१४७]प्राधिकाऱ्यास कागदपत्रांचा शोध घेणे किंवा ती सादर करणे या संबंधीची नोटीस महानगरपालिका कर्मचाऱ्याकडून मिळेल त्या बाबतीत ते [१४८]प्राधिकारी, उक्त कागदपत्रे ज्याच्या ताब्यात किंवा कब्जात असतील त्या खात्याकडे / विभागाकडे ती नोटीस किंवा तिच्या प्रती [१४९]पाठवतील व त्यासह एक मागणीपत्र पाठवून, त्या मागणीपत्रात विनिर्दिष्ट केलेल्या तारखेस अशी कागदपत्रे सादर करण्याबाबत [१५०]कळवतील.

परंतु, चौकशी [१५१]प्राधिकारी, त्याच्या मते प्रकरणाशी संबंधित नसतील अशा कागदपत्रांची मागणी करण्यास नकार देऊ शकेल, त्याची कारणे मात्र त्याला लेखी नमूद करावी लागतील.

(१४) पोट-नियम (१३) मध्ये निर्दिष्ट केलेल्या मागणीपत्र मिळाल्यावर असे, मागणी करण्यात आलेले कागदपत्र ज्याच्या ताब्यात आणि कब्जात असतील असे प्रत्येक [१५२]प्राधिकारी त्यांच्या ताब्यातील किंवा कब्जातील मागणी केलेली कागदपत्रे चौकशी [१५३]प्राधिकाऱ्यापुढे सादर करतील.

परंतु मागणी केलेली कागदपत्रे ज्याच्या ताब्यात किंवा कब्जात असतील त्या [१५४]प्राधिकाऱ्याची जर, खात्री पटली असेल की, अशी सर्व किंवा कोणतीही कागदपत्रे सादर करणे हे सार्वजनिक हितास किंवा महानगरपालिकेच्या हितास बाधक ठरेल तर ते तशी कारणे नमूद [१५५]करतील व चौकशी [१५६]प्राधिकाऱ्यास तसे [१५७]कळवतील, आणि असे कळविण्यात आल्यावर चौकशी [१५८]प्राधिकारी, महानगरपालिका कर्मचाऱ्याला ती माहिती [१५९]कळवतील व अशी कागदपत्रे शोधून सादर करण्याबाबत त्याने केलेली मागणी रद्द [१६०]करतील.

---

[१४७] ''प्राधिकरणास'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्यास'', [१४८] ''प्राधिकरण'' या शब्दाऐवजी ''प्राधिकारी'', [१४९] ''पाठवील'' या शब्दाऐवजी ''पाठवतील'', [१५०] ''कळवील'' या शब्दाऐवजी ''कळवतील'', [१५१, १५२] ''प्राधिकरण'' या शब्दाऐवजी ''प्राधिकारी'', [१५३] ''प्राधिकरणापुढे'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्यापुढे'', [१५४] ''प्राधिकरणाची '' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याची '', [१५५] ''करील'' या शब्दाऐवजी ''करतील'', [१५६] ''प्राधिकरणास'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्यास'', [१५७] ''कळवील'' या शब्दऐवजी कळवतील, [१५८] ''प्राधिकरण'' या शब्दाऐवजी ''प्राधिकारी'', [१५९] ''कळवील'' या शब्दऐवजी कळवतील व [१६०] ''करेल'' या शब्दंऐवजी करतील'' हे शब्द दाखल करण्यात आले.

(१५) चौकशी [१६१]प्राधिकाऱ्याकडून चौकशी सुरू करण्याविषयी निश्चित करण्यात आलेल्या तारखेस चौकशीस प्रारंभ करण्यात येईल आणि त्यानंतर त्या [१६२]प्राधिकाऱ्याकडून वेळोवेळी निश्चित करण्यात येईल किंवा येतील अशा तारखेस किंवा तारखांना ती पुढे चालू ठेवण्यात येईल.

(१६) चौकशीसाठी निश्चित केलेल्या तारखेला ज्या पुराव्याच्या आधारे दोषारोप सिध्द करावयाचे प्रस्तावित केले असेल तो मौखिक व कागदोपत्री पुरावा शिस्तभंगविषयक [१६३]प्राधिकाऱ्याकडून किंवा त्यांच्यावतीने सादर करण्यात येईल. साक्षीदारांची तपासणी सादरकर्ता अधिकाऱ्याकडून किंवा त्याच्यावतीने करण्यात येईल आणि साक्षीदारांची उलट तपासणी महानगरपालिका कर्मचाऱ्याकडून किंवा त्यांच्यावतीने करता येईल. साक्षीदाराची ज्या मुद्दयावर उलटतपासणी करण्यात आली असेल त्यापैकी कोणत्याही मुद्दयाची फेरतपासणी करण्याचा सादरकर्ता अधिकाऱ्यास हक्क असेल. परंतु चौकशी [१६४]प्राधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय कोणत्याही नवीन बाबीसंबंधात साक्षीदाराची फेरतपासणी करण्याचा हक्क त्याला असणार नाही. चौकशी [१६५]प्राधिकाऱ्याससुध्दा त्यांना योग्य वाटेल, असे प्रश्न साक्षीदारांना विचारता येतील.

(१७) प्रकरण बंद करण्यापूर्वी शिस्तभंगविषयक [१६६]प्राधिकाऱ्याच्यावतीने आवश्यकता भासत असेल तर, चौकशी [१६७]प्राधिकारी, आपल्या स्वेच्छाधिकारे महानगरपालिका कर्मचाऱ्याला दिलेल्या यादीमध्ये समाविष्ट न करण्यात आलेला पुरावा सादर करण्यास सादरकर्ता अधिकाऱ्याला परवानगी देऊ शकेल किंवा स्वत:हून नवीन पुरावा मागवू शकेल किंवा एखाद्या साक्षीदाराला पुन्हा बोलावून त्याची

---

[१६१, १६२, १६३] ''प्राधिकरणाकडून'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याकडून'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[१६४] ''प्राधिकरणाच्या'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याच्या'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[१६५] ''प्राधिकरणाससुद्धा'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याससुद्धा'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[१६६] ''प्राधिकरणाच्यावतीने'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याच्यावतीने'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[१६७] ''प्राधिकरणास'' या शब्दाऐवजी ''प्राधिकारी'' हा शब्द दाखल करण्यात आला.

फेरतपासणी करु शकेल आणि अशा बाबतीत महानगरपालिका कर्मचाऱ्याने मागणी केल्यास त्याला नवीन पुराव्याच्या यादीची प्रत मिळण्याचा आणि असा नवीन पुरावा सादर करण्यापूर्वी तीन पूर्ण दिवसांकरिता चौकशी तहकूब करुन मिळण्याचा हक्क असेल. यात, चौकशी तहकूब केल्याचा दिवस आणि ज्या दिवसापर्यंत चौकशी तहकूब केली तो दिवस, धरण्यात येणार नाही. चौकशी [१६८]प्राधिकारी, महानगरपालिका कर्मचाऱ्याला अशी कागदपत्रे, त्यांची अभिलेखात नोंद करण्यापूर्वी तपासण्याची संधी देईल. चौकशी प्राधिकाऱ्याच्या मते, असा पुरावा सादर करणे न्यायहिताच्या दृष्टीने आवश्यक असेल तर, तो महानगरपालिका कर्मचाऱ्याला नवीन पुरावा सादर करण्यासही अनुमती देऊ शकेल.

परंतु, मुळात सादर करण्यात आलेल्या पुराव्यात अंगभूत उणिवा किंवा दोष असल्याखेरीज त्या पुराव्यातील कोणतीही तफावत भरुन काढण्यासाठी कोणताही नवीन पुरावा सादर करण्यास परवानगी दिली जाणार नाही किंवा कोणताही नवीन पुरावा मागविला जाणार नाही किंवा कोणत्याही साक्षीदाराला पुन्हा बोलावण्यात येणार नाही.

(१८) शिस्तभंगविषयक [१६९]प्राधिकाऱ्याची बाजू मांडून झाल्यानंतर महानगरपालिका कर्मचाऱ्याला, त्याला योग्य वाटेल त्याप्रमाणे, आपला बचाव तोंडी किंवा लेखी नमूद करण्यास फर्माविण्यात येईल. त्याने तोंडी बचाव दिला असेल तर त्याची अभिलेखात नोंद करण्यात येईल आणि महानगरपालिका कर्मचाऱ्यास त्यावर सही करण्यास सांगण्यात येईल. दोन्हीपैकी कोणत्याही बाबतीत, बचावाच्या निवेदनाची प्रत, कोणताही सादरकर्ता अधिकारी नियुक्त केला असेल तर, त्याला दिली जाईल.

---

[१६८] ''प्राधिकरण'' या शब्दाऐवजी ''प्राधिकारी'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[१६९] ''प्राधिकरणाची'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याची'' हा शब्द दाखल करण्यात आला.

(१९) त्यानंतर महानगरपालिका कर्मचाऱ्याच्यावतीने पुरावा सादर करण्यात येईल. महानगरपालिका कर्मचाऱ्यास स्वत:च्या वतीने स्वत:ची तपासणी करावी असे वाटत असेल तर, तो तसे करू शकेल. त्यानंतर महानगरपालिका कर्मचाऱ्याने सादर केलेल्या साक्षीदारांची तपासणी केली जाईल आणि उलटतपासणी, फेरतपासणी किंवा तपासणी चौकशी [१७०]प्राधिकाऱ्याकडून केली जाईल. ही तपासणी [१७१]शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्याच्यावतीने साक्ष देणाऱ्या साक्षीदारांना लागू असणाऱ्या तरतूदीनुसार केली जाईल.

(२०) चौकशी प्राधिकारी महानगरपालिका कर्मचाऱ्याने त्याचे प्रकरण पूर्ण केल्यानंतर आणि महानगरपालिका कर्मचाऱ्याने स्वत: तपासणी केली नसेल तर सर्वसाधारणपणे पुराव्यामध्ये महानगरपालिका कर्मचाऱ्याविरूद्ध दिसून येणाऱ्या कोणत्याही परिस्थितीचे स्पष्टीकरण करणे त्याला शक्य व्हावे म्हणून त्या परिस्थितीबाबत प्रश्न विचारु शकेल.

(२१) पुरावा सादर करण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर चौकशी [१७२]प्राधिकारी, कोणत्याही सादरकर्ता अधिकाऱ्याची नियुक्ती झाली असल्यास त्या अधिकाऱ्याचे म्हणणे ऐकून घेईल, किंवा त्यांना आपापल्या संबंधित प्रकरणांची लेखी टाचणे सादर करण्याची इच्छा असेल तर त्यांना तसे करण्यास परवानगी देऊ शकेल.

---

[१७०] ''प्राधिकरणाकडून'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याकडून'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[१७१] ''शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्याच्यावतीने साक्ष देणाऱ्या'' हे शब्द जादा दाखल करण्यात आले.

[१७२] ''प्राधिकरण'' या शब्दाऐवजी ''प्राधिकारी'' हा शब्द दाखल करण्यात आला.

(२२) ज्या महानगरपालिका कर्मचाऱ्याला दोषारोपाच्या बाबींची प्रत देण्यात आली आहे, त्याने बचावाचे लेखी निवेदन सादर करण्यासाठी विनिर्दिष्ट केलेल्या तारखेला किंवा त्यापूर्वी असे निवेदन सादर केले नसेल किंवा तो चौकशी [१७३]प्राधिकाऱ्यापुढे जातीने उपस्थित झाला नसेल किंवा अन्यथा या नियमाच्या तरतूदीचे अनुपालन करण्यात त्याने कसूर केली असेल किंवा तसे करण्यास नकार दिला असेल तर चौकशी प्राधिकरण एकतर्फी चौकशी करू [१७४]शकतील.

(२३)(अ) ज्याबाबतीत कोणतीही किरकोळ शिक्षा करण्यास सक्षम असणाऱ्या परंतु कोणतीही जबर शिक्षा करण्यास सक्षम नसणाऱ्या शिस्तभंगविषयक [१७५]प्राधिकाऱ्याने आरोपाच्या कोणत्याही बाबींची स्वत: चौकशी केलेली असेल किंवा करवून घेतलेली असेल आणि त्याचा स्वत:चा निष्कर्ष किंवा त्याने नियुक्त केलेल्या कोणत्याही चौकशी [१७६]प्राधिकाऱ्याने दिलेल्या कोणत्याही निष्कर्षावरील स्वत:चा निर्णय विचारात घेतल्यानंतर महानगरपालिका कर्मचाऱ्याला कोणतीही जबर शिक्षा केली पाहिजे असे त्याचे मत झाले असेल त्याबाबतीत ते [१७७]प्राधिकारी अशी जबर शिक्षा करण्यास सक्षम असणाऱ्या शिस्तभंगविषयक [१७८]प्राधिकाऱ्याकडे चौकशीचा अभिलेख पाठविल.

(ब) ज्या शिस्तभंगविषयक [१७९]प्राधिकाऱ्याकडे अशा प्रकारे अभिलेख अग्रेषित करण्यात आला आहे. ते [१८०]प्राधिकारी अभिलेखाद्वारे मिळालेल्या पुराव्यावर कार्यवाही करू [१८१]शकतील, किंवा त्यांच्या मते न्यायहिताच्या दृष्टीने कोणत्याही साक्षीदाराची अधिक तपासणी करणे आवश्यक असेल तर त्या साक्षीदाराला पुन्हा बोलावून त्याची तपासणी,

---

[१७३] ''प्राधिकरणापुढे'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्यापुढे'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[१७४] ''शकेल'' या शब्दाऐवजी ''शकतील'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[१७५, १७६] ''प्राधिकरणाने'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याने'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[१७७] ''प्राधिकरण'' या शब्दाऐवजी ''प्राधिकारी'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[१७८, १७९] ''प्राधिकरणाकडे'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याकडे'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[१८०] ''प्राधिकरण'' या शब्दाऐवजी ''प्राधिकारी'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[१८१] ''शकेल'' या शब्दाऐवजी ''शकतील'' हा शब्द दाखल करण्यात आला.

उलटतपासणी व फेरतपासणी करू [१८२]शकतील, आणि या नियमानुसार त्याला योग्य वाटेल अशी शिक्षा महानगरपालिका कर्मचाऱ्याला करू शकेल -

परंतु, कोणत्याही साक्षीदारांना पुन्हा बोलावले असेल तर, त्याची महानगरपालिका कर्मचाऱ्याकडून किंवा त्याच्यावतीने उलटतपासणी करता येईल.

(२४) ज्या ज्या वेळी, कोणतेही चौकशी [१८३]प्राधिकारी एखाद्या चौकशीतील कर्मचाऱ्याचे म्हणणे ऐकल्यानंतर आणि संपूर्ण पुराव्याची किंवा पुराव्यातील कोणत्याही भागाची नोंद केल्यानंतर, त्या चौकशीत आपली अधिकारिता वापरल्याचे थांबवत असेल त्या [१८४]प्राधिकाऱ्याच्या जागी अशी अधिकारिता असलेले दुसरे चौकशी [१८५]प्राधिकारी नेमण्यात आले [१८६]असतील व ते अशा अधिकारितेचा वापर करीत [१८७]असतील त्या त्या वेळी, असे नंतर येणारे [१८८]प्राधिकारी पूर्वीच्या [१८९]प्राधिकाऱ्यानी नोंदविलेल्या पुराव्यावरुन किंवा अंशतः पूर्वीच्या [१९०]प्राधिकाऱ्यानी व अंशतः स्वतः नोंदविलेल्या पुराव्यावरुन कार्यवाही करु [१९१]शकतील.

परंतु, ज्यांची साक्ष या अगोदरच नोंदविण्यात आली आहे, अशा साक्षीदारांपैकी कोणत्याही साक्षीदाराची अधिक तपासणी करणे न्यायहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे, असे नंतर आलेल्या चौकशी [१९२]प्राधिकाऱ्याचे मत असेल तर, त्या [१९३]प्राधिकाऱ्यास यात यापूर्वीच तरतूद केल्याप्रमाणे अशा कोणत्याही साक्षीदाराला पुन्हा बोलावून त्याची तपासणी, उलटतपासणी आणि फेरतपासणी करता येईल. [१९४]परंतु असे की, कोणत्याही साक्षीदाराला पुन्हा बोलाविण्यात आले असेल तर, महानगरपालिका कर्मचाऱ्यास किंवा त्याच्यावतीने त्यांची उलटतपासणी करता येईल.

---

[१८२] ''शकेल'' या शब्दाऐवजी ''शकतील'' , [१८३] ''प्राधिकरण'' या शब्दाऐवजी ''प्राधिकारी'', [१८४] ''प्राधिकरणाच्या'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याच्या'', [१८५] ''प्राधिकरण'' या शब्दाऐवजी ''प्राधिकारी'', [१८६, १८७] ''असेल'' या शब्दाऐवजी ''असतील'', [१८८] ''प्राधिकरण'' या शब्दाऐवजी ''प्राधिकारी'' , [१८९, १९०] ''प्राधिकरणाने'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्यानी '', [१९१]''शकेल'' या शब्दाऐवजी ''शकतील'', [१९२]''प्राधिकरणाचे'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याचे'' आणि [१९३] ''प्राधिकरणास'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्यास'' हे शब्द दाखल करण्यात आले.

[१९४] ''परंतु असे की, कोणत्याही साक्षीदाराला पुन्हा बोलाविण्यात आले असेल तर, महानगरपालिका कर्मचाऱ्यास किंवा त्याच्यावतीने त्यांची उलटतपासणी करता येईल'' हा मजकूर नव्यानेसमाविष्ट करण्यात आला.

(२५) चौकशी पूर्ण झाल्यानंतर चौकशी [१९५]प्राधिकाऱ्याकडून अहवाल तयार करण्यात येईल. या अहवालामध्ये पुढे दिलेल्या बाबी नमूद करण्यात येतील -

(अ) दोषारोपाच्या बाबी आणि गैरवर्तनाच्या किंवा गैरवर्तणूकीच्या आरोपांचे विवरणपत्र.

(ब) दोषारोपाच्या प्रत्येक बाबींच्या संबंधात महानगरपालिका कर्मचाऱ्याने केलेला बचाव.

(क) दोषारोपाच्या प्रत्येक बाबी संबंधातील पुराव्याचे मूल्यमापन.

(ड) दोषारोपाच्या प्रत्येक बाबींवरील निष्कर्ष आणि त्याची कारणे.

(ई)[१९६]****

(२६) ज्या बाबतीत चौकशी [१९७]प्राधिकाऱ्यांच्या मते, चौकशीच्या कामकाजातून मूळ दोषारोपापेक्षा वेगळा दोषारोप सिध्द होत असेल अशा बाबतीत अशा दोषारोपाच्या संबंधातील आपले निष्कर्ष [१९८]त्यांना नमूद करता येतील.

परंतु, असा दोषारोप ज्या तथ्यांवर आधारलेला असेल ती तथ्ये महानगरपालिका कर्मचाऱ्याने कबूल केली असल्याखेरीज किंवा अशा दोषारोपाविरुध्द स्वत:चा बचाव करण्याची वाजवी संधी त्याला देण्यात आल्याखेरीज अशा दोषारोपांचे निष्कर्ष नमूद करण्यात येणार नाहीत.

---

[१९५] ''प्राधिकरणाकडून'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याकडून'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[१९६] ''(ई) शिक्षेच्या प्रमाणासंबंधात शिफारस'' हा मजकूर वगळण्यात आला.

[१९७] ''प्राधिकरणाच्या'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्यांच्या'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[१९८] ''त्याला'' या शब्दाऐवजी ''त्यांना'' हा शब्द दाखल करण्यात आला.

(२७) चौकशी [१९९]प्राधिकारी, हे स्वत: शिस्तभंगविषयक [२००]प्राधिकारी नसतील त्याबाबतीत ते शिस्तभंगविषयक [२०१]प्राधिकाऱ्याकडे चौकशीचे अभिलेख अग्रेषित [२०२]करतील. या अभिलेखांमध्ये पुढे दिलेल्या बाबी समाविष्ट असतील -

(अ) पोट-नियम (२५) अन्वये त्याने तयार केलेला अहवाल.

(ब) महानगरपालिका कर्मचाऱ्याने आपल्या बचावाचे कोणतेही लेखी निवेदन सादर केले असल्यास ते लेखी निवेदन.

(क) चौकशी चालू असताना सादर करण्यात आलेला तोंडी व कागदोपत्री पुरावा.

(ड) चौकशीचे काम चालू असताना सादरकर्ता अधिकाऱ्याने किंवा महानगरपालिका कर्मचाऱ्याने किंवा दोघांनी सादर केलेली कोणतीही लेखी टाचणे असल्यास ती टाचणे, आणि

(ई) शिस्तभंगविषयक [२०३]प्राधिकाऱ्याने आणि चौकशी [२०४]प्राधिकाऱ्याने चौकशीच्या संबंधात कोणतेही आदेश दिले असल्यास ते आदेश.

**९. चौकशी अहवालावरील कार्यवाही:-**

(१) शिस्तभंगविषयक [२०५]प्राधिकारी हे स्वत: चौकशी [२०६]प्राधिकारी नसतील तर, ते लेखी कारणे नमूद करुन सदर प्रकरण अधिक चौकशीसाठी आणि अहवालासाठी चौकशी [२०७]प्राधिकाऱ्याकडे पाठवू शकेल. आणि त्यानंतर चौकशी [२०८]प्राधिकारी शक्यतोवर या नियमाच्या नियम ८ च्या तरतूदी अन्वये या संबंधात अधिक चौकशी करण्याकरिता कार्यवाही [२०९]करतील.

---

[१९९] ''प्राधिकरण'' या शब्दाऐवजी ''प्राधिकारी'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[२००] ''प्राधिकरण असेल'' या शब्दांऐवजी ''प्राधिकारी नसतील'' हे शब्द दाखल करण्यात आले.

[२०१] ''प्राधिकरणाकडे'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याकडे'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[२०२] ''करील'' या शब्दाऐवजी ''करतील'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[२०३, २०४] ''प्राधिकरणाने'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याने'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[२०५] ''प्राधिकरण'' या शब्दाऐवजी ''प्राधिकारी'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[२०६] ''प्राधिकरण नसेल'' या शब्दांऐवजी ''प्राधिकारी नसतील'' हे शब्द दाखल करण्यात आले.

[२०७] ''प्राधिकरणाकडे'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याकडे'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[२०८] ''प्राधिकरण'' या शब्दाऐवजी ''प्राधिकारी'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[२०९] ''करील'' या शब्दाऐवजी ''करतील'' हा शब्द दाखल करण्यात आला.

(२) शिस्तभंगविषयक [२१०]प्राधिकाऱ्याने कोणतीही चौकशी केली असल्यास, त्या चौकशी अहवालाची प्रत किंवा शिस्तभंगविषयक [२११]प्राधिकारी हे स्वत: चौकशी [२१२]प्राधिकारी नसतील त्याबाबतीत, चौकशी [२१३]प्राधिकाऱ्याने काढलेल्या निष्कर्षास असहमत असल्यास असहमतीच्या तात्पुरत्या निष्कर्षासह त्या चौकशी अहवालाची प्रत, संबंधित महानगरपालिका कर्मचाऱ्याला पाठविण्यात येईल. चौकशी अहवाल संबंधित महानगरपालिका कर्मचारी यास अनुकूल असो वा प्रतिकूल असो, संबंधित महानगरपालिका कर्मचाऱ्याची तशी इच्छा असल्यास कमाल १५ दिवसाच्या आत तो त्यासंदर्भातील निवेदन शिस्तभंगविषयक [२१४]प्राधिकाऱ्यास सादर [२१५]करेल.

(२-ए) जर महानगरपालिका कर्मचाऱ्याने काही निवेदन सादर केले असेल तर त्याचा शिस्तभंगविषयक [२१६]प्राधिकारी विचार [२१७]करतील आणि या नियमाच्या पोट-नियम (३) आणि (४) मध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यापूर्वी त्या संदर्भातील निष्कर्ष अभिलेखीत [२१८]करतील.

(३) दोषारोपांच्या सर्व किंवा कोणत्याही बाबींच्या संबंधातील आपले निष्कर्ष लक्षात घेता, महानगरपालिका कर्मचाऱ्याला कोणतीही किरकोळ शिक्षा देण्यात यावी, असे शिस्तभंगविषयक [२१९]प्राधिकाऱ्याचे मत असेल त्या बाबतीत या नियमांच्या नियम क्र.१० मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, नियम क्र.८ अन्वये करण्यात आलेल्या चौकशीच्या वेळी पुढे आलेल्या पुराव्याच्या आधारे, [२२०]**** [२२१]शिस्तभंगविषयक प्राधिकारी महानगरपालिका कर्मचाऱ्याला कोणतीही शिक्षा द्यावयाची असल्यास कोणती शिक्षा द्यावी ते निश्चित [२२२]करतील आणि ती शिक्षा देण्यासंबंधी आदेश [२२३]काढतील.

---

[२१०] ''प्राधिकरणाने'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याने'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[२११] ''प्राधिकरण'' या शब्दाऐवजी ''प्राधिकारी'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[२१२] ''प्राधिकरण नसेल'' या शब्दांऐवजी ''प्राधिकारी नसतील'' हे शब्द दाखल करण्यात आले.

[२१३] ''प्राधिकरणाने'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याने'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[२१४] ''प्राधिकरणास'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्यास'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[२१५] ''करील'' या शब्दाऐवजी ''करेल'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[२१६] ''प्राधिकरण'' या शब्दाऐवजी ''प्राधिकारी'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[२१७, २१८] ''करील'' या शब्दाऐवजी ''करतील'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[२१९] ''प्राधिकरणाचे'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याचे '' हा शब्द दाखल करण्यात आला. [२२०] ''हे स्वत:'' हे शब्द वगळण्यात आले. [२२१] '' चौकशी प्राधिकरण'' या शब्दाऐवजी ''शिस्तभंगविषयक प्राधिकारी'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[२२२] ''करील'' या शब्दाऐवजी ''करतील'' आणि [२२३] ''काढील'' या शब्दाऐवजी ''काढतील''हे शब्द दाखल करण्यात आले.

(४) दोषारोपांच्या सर्व किंवा कोणत्याही बाबींच्या संबंधातील आपले निष्कर्ष विचारात घेतल्यावर, आणि चौकशीच्या वेळी पुढे आलेल्या पुराव्याच्या आधारे, नियम ५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षेपैकी कोणतीही शिक्षा महानगरपालिका कर्मचाऱ्यास द्यावी असे शिस्तभंगविषयक [२२४]प्राधिकाऱ्याचे मत असेल त्याबाबतीत, ते असा शिक्षा देणारा आदेश [२२५]काढतील आणि महानगरपालिका कर्मचाऱ्यास, त्याला देण्यात यावयाच्या शिक्षेबद्दल कोणतेही अभिवेदन करण्याची संधी देणे आवश्यक असणार नाही.

**१०. किरकोळ शिक्षा देण्याबाबतची कार्यपध्दती [२२६](खात्यांतर्गत संक्षिप्त चौकशी):-**

(१) नियम ९ च्या पोट-नियम (३) मध्ये केलेल्या तरतूदीखेरीज, महानगरपालिका कर्मचाऱ्याला दिल्या जाणाऱ्या किरकोळ शिक्षांपैकी कोणतीही शिक्षा देण्यासंबंधात पुढे नमूद केलेल्या बाबी पूर्ण केल्याशिवाय कोणताही आदेश देण्यात येणार नाही -

(अ) महानगरपालिका कर्मचाऱ्याविरुध्द करावयाची प्रस्तावित कार्यवाही व गैरवर्तणूकीच्या किंवा गैरवर्तनाच्या ज्या आरोपांमुळे ही कार्यवाही करण्याचे योजिले आहे ते आरोप लेखी कळविणे आणि प्रस्तावाविरुध्द अभिवेदन करण्याची त्याची इच्छा असेल ते अभिवेदन करण्याची त्याला वाजवी संधी देणे.

(ब) शिस्तभंगविषयक प्राधिकरणाच्या मते ज्या प्रकरणी चौकशी आवश्यक असेल अशा प्रत्येक प्रकरणात नियम ८ मध्ये निर्धारित केलेल्या पद्धतीनुसार चौकशी करणे.

---

[२२४] ''प्राधिकरणाचे'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याचे'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[२२५] ''काढील'' या शब्दाऐवजी ''काढतील'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[२२६] ''(खात्यांतर्गत संक्षिप्त चौकशी)'' हे शब्द दाखल करण्यात आले.

(क) या नियमाच्या खंड [२२७]**** (अ) अन्वये महानगरपालिका कर्मचाऱ्याने कोणतेही अभिवेदन केले असल्यास, ते अभिवेदन आणि या नियमाच्या खंड (ब) अन्वये कोणतीही चौकशी केली असल्यास त्या चौकशीचा अभिलेख विचारात घेणे,

(ड) गैरवर्तणूकीच्या किंवा गैरवर्तनाच्या प्रत्येक आरोपाचा निष्कर्ष नमूद करणे. [२२८]****

(२) पोटनियम (१) च्या खंड (ब) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही एखाद्या प्रकरणात त्या पोटनियमाच्या खंड (अ) अन्वये महानगरपालिका कर्मचाऱ्याने अभिवेदन केले असल्यास ते अभिवेदन विचारात घेतल्यानंतर [२२९]**** वेतनवाढी रोखून ठेवण्याचे प्रस्तावित केले असेल आणि अशा वेतनवाढी रोखून ठेवल्यामुळे कर्मचाऱ्याला देय असलेल्या निवृत्तीवेतनाच्या रकमेवर प्रतिकूल परिणाम होण्याचा संभव असेल किंवा ३ वर्षापेक्षा अधिक असेल एवढया कालावधीकरता वेतनवाढ रोखून ठेवण्याचे प्रस्तावित केले असेल [२३०]**** किंवा भविष्यातील वेतनवाढीवर परिणाम करुन कोणत्याही कालावधीकरिता वेतनवाढी रोखण्याचे प्रस्तावित केले असेल तर, महानगरपालिका कर्मचाऱ्याला अशी कोणतीही शिक्षा देण्याचा आदेश देण्यापूर्वी नियम क्र.८ च्या पोट-नियम (३) ते (२७) मध्ये निर्धारित केलेल्या पद्धतीनुसार चौकशी करण्यात येईल.

(३) अशा प्रकरणांच्या कार्यवाहीच्या अभिलेखात पुढील बाबींचा समावेश असेल:-

(एक) महानगरपालिका कर्मचाऱ्याला त्याच्यावर करण्यात येणाऱ्या कार्यवाहीसंबंधीच्या प्रस्तावाच्या सूचनेची प्रत,

(दोन) गैरवर्तणूक किंवा गैरवर्तन याबाबतच्या आरोपाच्या विवरणपत्राची कर्मचाऱ्याला देण्यात आलेली प्रत,

---

[२२७] '' :''हा अंक वगळण्यात आला.

[२२८] ''आणि'' हा शब्द वगळण्यात आला.

[२२९] ''त्याच्या'' हा शब्द वगळण्यात आला.

[२३०] ''किंवा नियम ५ (अ) मध्ये विनिर्दिष्ट शिक्षेपैकी कोणतीही शिक्षा द्यावयाची असेल तर'' हा मजकूर वगळण्यात आला.

(तीन) कर्मचाऱ्याने कोणतीही अभिवेदने दिली असल्यास ती अभिवेदने,

(चार) चौकशीमध्ये सादर करण्यात आलेला पुरावा,

(पाच) गैरवर्तणूक किंवा गैरवर्तन या संबंधातील प्रत्येक आरोपावरील निष्कर्ष आणि

(सहा) प्रकरणावरील आदेश व त्याची कारणे.

**११. कर्मचाऱ्यास आदेश कळविणेः-**

शिस्तभंगविषयक [२३१]प्राधिकाऱ्याचे आदेश दोषारोपाच्या प्रत्येक बाबीसंबंधातील [२३२]निष्कर्ष महानगरपालिका कर्मचाऱ्याला कळविण्यात येतील किंवा जेथे शिस्तभंगविषयक [२३३]प्राधिकारी चौकशी [२३४]प्राधिकाऱ्याच्या निष्कर्षाशी सहमत [२३५]नसतील तेथे असहमतीची थोडक्यात कारणे आणि चौकशी प्राधिकरणाने [२३६]काढलेला निष्कर्ष, या गोष्टीही त्याला देण्यात येतील.

**१२. एकत्रित कार्यवाहीः-**

(१) ज्या प्रकरणात दोन किंवा अधिक महानगरपालिका कर्मचारी संबंधित असतील अशा कोणत्याही बाबतीत महानगरपालिका आयुक्त किंवा अशा सर्व महानगरपालिका कर्मचाऱ्यांना सेवेतून बडतर्फ करण्यास सक्षम असलेले दुसरे कोणतेही [२३७]प्राधिकारी एकत्रित कार्यवाही करुन त्या सर्व कर्मचाऱ्यांविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्याचा निर्देश देणारा आदेश देऊ [२३८]शकतील.

---

[२३१] ''प्राधिकरणाचे'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याचे'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[२३२] ''निष्कर्षाच्या प्रतीसह'' या शब्दाऐवजी ''निष्कर्ष'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[२३३] ''प्राधिकरण'' या शब्दाऐवजी ''प्राधिकारी'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[२३४] ''प्राधिकरणाच्या'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याच्या'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[२३५] ''नसेल'' या शब्दाऐवजी ''नसतील'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[२३६] ''काढलेल्या निष्कर्षासह शिस्तभंगविषयक प्राधिकरणाच्या निष्कर्षाचे विवरणपत्र'' या शब्दाऐवजी ''काढलेला निष्कर्ष'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[२३७] ''प्राधिकरण'' या शब्दाऐवजी ''प्राधिकारी'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[२३८] ''शकेल'' या शब्दाऐवजी ''शकतील'' हा शब्द दाखल करण्यात आला.

(२) अशा महानगरपालिका कर्मचाऱ्यांना बडतर्फ करण्याची शिक्षा देण्यास सक्षम [२३९]असलेले प्राधिकारी वेगवेगळे असतील अशा बाबतीत, अशा [२४०]प्राधिकाऱ्यांपैकी सर्वोच्च असणारे [२४१]प्राधिकारी [२४२]**** एकत्रित कार्यवाही करुन शिस्तभंगविषयक कारवाई करण्याचा निदेश देणारा आदेश देऊ [२४३]शकतील.

(३) एकत्रित कार्यवाही करुन शिस्तभंगविषयक कारवाई करण्याबाबत देण्यात आलेल्या प्रत्येक आदेशामध्ये पुढे नमूद केलेल्या बाबी विनिर्दिष्ट करण्यात येतील -

(एक) अशी एकत्रित कार्यवाही करण्याकरिता शिस्तभंगविषयक [२४४]प्राधिकारी म्हणून काम पाहू शकेल असे [२४५]प्राधिकारी.

(दोन) असे शिस्तभंगविषयक [२४६]प्राधिकारी ज्या शिक्षा देण्यास सक्षम असेल अशा, नियम ५ (अ) व ५ (ब) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षा,

(तीन) कार्यवाही करताना नियम ८ आणि नियम ९ किंवा नियम १० मध्ये नमूद केलेली कार्यपध्दती अवलंबण्यात येईल किंवा कसे.

**१३. विवक्षित प्रकरणांमध्ये विशेष कार्यपद्धती:-**

या नियमांच्या नियम ८ ते नियम १२ यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी -

(एक) महानगरपालिका कर्मचाऱ्याच्या ज्या वर्तनामुळे त्याच्यावर फौजदारी गुन्ह्याचा आरोप ठेवण्यात येऊन तो दोषी ठरला असेल व त्याला कोणतीही शिक्षा देय झाली असेल, **किंवा**

---

[२३९] ''असलेली प्राधिकरणे वेगवेगळी'' या शब्दाऐवजी ''असलेले प्राधिकारी वेगवेगळे'' हे शब्द दाखल करण्यात आले.

[२४०] ''प्राधिकरणापैकी'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्यांपैकी'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[२४१] ''प्राधिकरण'' या शब्दाऐवजी ''प्राधिकारी'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[२४२] ''इतर प्राधिकरणांच्या संमतीने'' हे शब्द वगळण्यात आले.

[२४३] ''शकेल'' या शब्दाऐवजी ''शकतील'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[२४४, २४५, २४६] ''प्राधिकरण'' या शब्दाऐवजी ''प्राधिकारी'' हा शब्द दाखल करण्यात आला.

(दोन) या नियमांमध्ये तरतूद केलेल्या पध्दतीनुसार चौकशी करणे वाजवी रीतीने व्यवहार्य ठरत नाही अशी शिस्तभंगविषयक [२४७]प्राधिकाऱ्याची खात्री पटली असेल व त्याने त्याबाबतची कारणे लेखी नमूद केली असतील, **किंवा**

(तीन) या नियमांमध्ये तरतूद केलेल्या पध्दतीनुसार कोणतीही चौकशी करणे महानगरपालिका सुरक्षिततेच्या दृष्टीने इष्ट नाही, अशी महानगरपालिका आयुक्तांची खात्री पटली असेल अशा बाबतीत शिस्तभंगविषयक [२४८]प्राधिकारी प्रकरणाची परिस्थिती विचारात घेऊन त्यासंबंधी त्यास योग्य वाटतील ते आदेश देऊ शकेल.

(चार) अपचारी महानगरपालिका कर्मचाऱ्याच्या मृत्यूनंतर शिस्तभंग कारवाई तात्काळ संपुष्टात येते. त्यामुळे या नियमाखालील कोणतीही शिस्तभंग कारवाई संबंधित अपचारी महानगरपालिका कर्मचाऱ्याच्या मृत्यूनंतर चालू ठेवता येणार नाही.

[२४९]परंतु खंड (एक) खालील कोणताही आदेश काढण्यात येण्यापूर्वी महानगरपालिका कर्मचाऱ्याला, त्याला देण्यात यावयाच्या शिक्षेबाबत अभिवेदन करण्याची संधी दिली जाऊ शकेल.

**१४. राज्य शासन, स्थानिक प्राधिकरण, इत्यादींना ज्यांच्या सेवा उसन्या दिलेल्या असतील अशा अधिकाऱ्यांच्या बाबतीतील तरतूदीः-**

(१) महानगरपालिका कर्मचाऱ्यांची सेवा महानगरपालिकेमधील एका विभागाने दुसऱ्या विभागाला किंवा अन्य स्थानिक प्राधिकरणाला किंवा राज्य शासनाला किंवा दुसऱ्या कोणत्याही महानगरपालिकेला

---

[२४७] ''प्राधिकरणाची'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याची '' हा शब्द दाखल करण्यात आला.

[२४८] ''प्राधिकरण'' या शब्दाऐवजी ''प्राधिकारी '' हा शब्द दाखल करण्यात आला.

[२४९] ''परंतु खंड (एक) खालील कोणताही आदेश काढण्यात येण्यापूर्वी महानगरपालिका कर्मचाऱ्याला, त्याला देण्यात यावयाच्या शिक्षेबाबत अभिवेदन करण्याची संधी दिली जाऊ शकेल.'' हा मजकूर नव्याने समाविष्ट करण्यात आला.

किंवा त्याला दुय्यम असणाऱ्या प्राधिकरणाला किंवा स्थानिक किंवा (महानगरपालिकेच्या मालकीची किंवा त्याच्या नियंत्रणाखालील कोणतीही कंपनी किंवा कोणतेही महामंडळ यांसह) इतर प्राधिकरणाला (या नियमांमध्ये यापुढे ज्याचा 'उसनी सेवा घेणारे प्राधिकरण' म्हणून निर्देश केलेला आहे) उसनी दिलेली असेल त्या बाबतीत, अशी उसनी सेवा घेणाऱ्या प्राधिकरणाला अशा महानगरपालिका कर्मचाऱ्याला [२५०]त्या सेवेतील कथित गैरवर्तणूक किंवा गैरवर्तनाकरिता नियुक्ती प्राधिकाऱ्याचे, शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याच्या प्रयोजनाकरिता शिस्तभंगविषयक प्राधिकरणाचे अधिकार असतील.

परंतु असे की, सेवा उसनी घेणारे प्राधिकरण, महानगरपालिका कर्मचाऱ्याची सेवा उसनी देणाऱ्या प्राधिकरणाला (या नियमामध्ये यापुढे ज्याचा ''सेवा उसनी देणारे प्राधिकरण'' असा निर्देश केलेला आहे) अशा महानगरपालिका कर्मचाऱ्याला निलंबित करण्याचा आदेश देण्यास किंवा यथास्थिती, त्याच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही सुरू करण्यास कारणीभूत ठरणारी परिस्थिती तात्काळ कळवील.

(२) महानगरपालिका कर्मचाऱ्याविरूध्द शिस्तभंगाची कार्यवाही करताना काढण्यात आलेले निष्कर्ष विचारात घेता -

(एक) महानगरपालिका कर्मचाऱ्याला कोणतीही किरकोळ शिक्षा देण्यात यावी असे उसनी सेवा घेणाऱ्या प्राधिकरणाचे मत असेल तर ते, सेवा उसनी देणाऱ्या प्राधिकरणाशी विचारविनिमय केल्यानंतर त्यासंबंधात त्यास आवश्यक वाटतील ते आदेश देऊ शकेल.

---

[२५०] ''निलंबनाधीन ठेवण्याच्या प्रयोजनाकरिता शिस्तभंगविषयक प्राधिकरणाचे अधिकारी असतील'' या शब्दांऐवजी ''त्या सेयेतील कथित गैरवर्तणूक किंवा गैरवर्तनाकरितानियुक्ती प्राधिकाऱ्याचे, शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याच्या प्रयोजनाकरिता शिस्तभंगविषयक प्राधिकरणाचे अधिकार असतील'' हे शब्द दाखल करण्यात आले.

परंतु, सेवा उसनी घेणारे प्राधिकरण व सेवा उसनी देणारे प्राधिकरण यांच्यात काही मतभेद असतील तर, महानगरपालिका कर्मचाऱ्याची सेवा, सेवा उसनी देणाऱ्या प्राधिकरणाकडे परत करण्यात येईल.

(दोन) महानगरपालिका कर्मचाऱ्याला कोणतीही जबर शिक्षा देण्यात यावी असे महानगरपालिका कर्मचाऱ्याची सेवा उसनी घेणाऱ्या प्राधिकरणाचे मत असेल तर, ते प्राधिकरण, त्याची सेवा, सेवा उसनी देणाऱ्या प्राधिकरणाकडे परत करील आणि चौकशीविषयक कामकाजही त्या प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करील आणि त्यानंतर सेवा उसनी देणारे प्राधिकरण हे जर शिस्तभंगविषयक प्राधिकरण असेल तर ते, त्यावर त्याला आवश्यक वाटतील असे आदेश काढील किंवा जर ते शिस्तभंगविषयक प्राधिकरण नसेल तर ते प्रकरण शिस्तभंगविषयक प्राधिकरणास सादर करील आणि शिस्तभंगविषयक प्राधिकरण त्यावर त्यास आवश्यक वाटतील असे आदेश काढील.

परंतु, असा कोणताही आदेश काढण्यापूर्वी शिस्तभंगविषयक प्राधिकरण, या नियमांच्या नियम ९ च्या पोट-नियम (३) व (४) च्या तरतूदींचे अनुपालन करील.

(३) शिस्तभंगविषयक प्राधिकरण एकतर, सेवा उसनी घेणाऱ्या प्राधिकरणाने त्याच्याकडे पाठविलेल्या चौकशी अभिलेखाच्या आधारे किंवा शक्यतोवर या नियमांच्या नियम ८ च्या तरतूदींनुसार त्याला आवश्यक वाटेल त्याप्रमाणे पुढील चौकशी केल्यानंतर या नियमाच्या पोट-नियम (२) च्या खंड (दोन) खाली आदेश काढू शकेल.

---

**१५. राज्य शासन, स्थानिक प्राधिकरण इत्यादीकडून उसन्या घेतलेल्या अधिकाऱ्यांसंबंधी तरतूदः-**

(१) राज्य शासन, स्थानिक प्राधिकरण इत्यादीकडून ज्या कर्मचाऱ्याची सेवा उसनी घेतली असेल अशा कर्मचाऱ्याविरुध्द निलंबनाचा आदेश देण्यात आला असेल किंवा शिस्तभंगविषयक कार्यवाही केलेली असेल त्याबाबतीत, ज्या परिस्थितीमुळे त्या [२५१]**** कर्मचाऱ्याच्या निलंबनाचा आदेश काढावा लागला असेल किंवा, यथास्थिती, त्याच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही सुरु करावी लागली असेल त्या परिस्थितीची माहिती त्याची सेवा उसनी देणाऱ्या प्राधिकरणाला (या नियमात यापुढे ज्याला ''सेवा उसनी देणारे प्राधिकरण'' असे निर्देशिलेले आहे) तात्काळ कळविण्यात येईल.

(२) [२५२]अशा कर्मचाऱ्याविरुध्द केलेल्या शिस्तभंगविषयक कार्यवाहीतील निष्कर्षांना अनुलक्षून,

(एक) जर त्या कर्मचाऱ्याला कोणतीही किरकोळ शिक्षा देण्यात यावी असे शिस्तभंगविषयक प्राधिकरणाचे मत असेल तर, ते प्राधिकरण, या नियमांच्या नियम ९ च्या पोट-नियम (३) मधील तरतूदीच्या अधीन राहून, सेवा उसनी देणाऱ्या प्राधिकरणाशी विचारविनिमय केल्यानंतर, त्याला आवश्यक वाटतील त्याप्रमाणे, त्या प्रकरणात आदेश काढू शकेल -

परंतु, सेवा उसनी घेणारे प्राधिकरण आणि सेवा उसनी देणारे प्राधिकरण या दोघांमध्ये मतभेद असेल तर, [२५३]त्या कर्मचाऱ्याची सेवा, सेवा उसनी देणाऱ्या प्राधिकरणाकडे परत करण्यात येईल.

---

[२५१] ''महानगरपालिका'' हा शब्द वगळण्यात आला.

[२५२] ''महानगरपालिका'' या शब्दाऐवजी ''अशा''हा शब्द दाखल करण्यात आला.

[२५३] ''शासकीय'' या शब्दाऐवजी ''त्या''हा शब्द दाखल करण्यात आला.

(दोन) [२५४]अशा कर्मचाऱ्याला कोणतीही जबर शिक्षा देण्यात यावी असे शिस्तभंगविषयक प्राधिकरणाचे मत असेल तर, ते प्राधिकरण, अशा कर्मचाऱ्याची सेवा, सेवा उसनी देणाऱ्या प्राधिकरणाकडे परत करील आणि त्याला (सेवा उसनी देणाऱ्या प्राधिकरणाला) आवश्यक वाटेल त्याप्रमाणे कार्यवाही करण्याकरिता चौकशीचे कामकाज त्याच्याकडे हस्तांतरीत करील.

---

[२५४] ''महानगरपालिका'' या शब्दाऐवजी ''अशा''हा शब्द दाखल करण्यात आला.

## भाग पाच-अपीले

**१६. ज्याविरूध्द कोणतेही अपील करता येत नाही असे आदेश:-**

या भागामध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही पुढील बाबतीत कोणतेही अपील करता येणार नाही -

[२५५](एक) शिक्षण समितीने/स्थायी समितीने/महानगरपालिकेने पारित केलेला कोणताही आदेश.

[२५६](दोन) महानगरपालिका आयुक्तांनी काढलेला प्रशासकीय आदेश.

[२५७](तीन) निलंबनाच्या आदेशाव्यतिरिक्त शिस्तभंगविषयक कार्यवाहीतील वादकालीन स्वरूपाचा किंवा सहायक स्वरूपाचा किंवा प्रकरण अंतिमरित्या निकालात काढण्याबाबत कोणताही आदेश.

[२५८](चार) या नियमांच्या नियम ८ खालील चौकशीच्या ओघात चौकशी [२५९]प्राधिकाऱ्याने काढलेला कोणताही आदेश.

**१७. ज्याविरूध्द अपील करता येते असे आदेश:-**

नियम १६ च्या तरतूदींना अधीन राहून महानगरपालिका कर्मचारी, पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही आदेशाविरुध्द अपील दाखल करू शकेल असे -

(एक) या नियमांच्या नियम ४ अन्वये काढलेला किंवा काढला असल्याचे मानण्यात आलेला निलंबन आदेश.

-----------------------------------------------------

[२५५] ''(एक) शिक्षण समितीने/स्थायी समितीने/महानगरपालिकेने पारित केलेला कोणताही आदेश'' हा मजकूर नव्याने समाविष्ट करण्यात आला.

[२५६] ''अनु.क्र.(एक) या ऐवजी अनु.क्र.(दोन) असा बदल करण्यात आला. तथापि, मजकूरात कोणताही बदल नाही.

[२५७] ''अनु.क्र.(दोन) या ऐवजी अनु.क्र.(तीन) असा बदल करण्यात आला. तथापि, मजकूरात कोणताही बदल नाही.

[२५८] ''अनु.क्र.(तीन) या ऐवजी अनु.क्र.(चार) असा बदल करण्यात आला. तथापि, मजकूरात कोणताही बदल नाही.

[२५९] ''प्राधिकरणाने'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याने'' हा शब्द दाखल करण्यात आला.

(दोन) या नियमांच्या नियम क्र.५ (अ) व ५ (ब) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षांपैकी कोणतीही शिक्षा करणारा आदेश [२६०]****.

(तीन) या नियमांच्या नियम ५ (अ) व ५ (ब) अन्वये केलेली कोणतीही शिक्षा वाढविणारा आदेश.

(चार) ज्या आदेशामुळे -

(अ) नियमांद्वारे किंवा कराराद्वारे विनियमित केलेले त्याचे वेतन, भत्ते, निवृत्तीवेतन किंवा इतर सेवाशर्ती, त्याला अहितकारक ठरतील अशा प्रकारे नाकारण्यात येतात किंवा त्यामध्ये बदल केला जातो, किंवा

(ब) सेवाप्रवेश नियमांनुसार ज्या पदोन्नतीस तो अन्यथा पात्र ठरला असता अशी आणि त्याच्या वरिष्ठता क्रमानुसार त्याला देय असेल अशी पदोन्नती त्याला नाकारली जाते, किंवा

(क) अशा कोणत्याही नियमाच्या किंवा कराराच्या तरतुदींचा त्याला अहितकारक ठरेल अशा प्रकारे अर्थ लावण्यात येतो, असा आदेश,

(पाच) ज्या आदेशामुळे -

(अ) [२६१]****

[२६२](अ) शिक्षा म्हणून नव्हे तर अन्यथा, तो उच्च सेवेत, श्रेणीत किंवा पदावर स्थानापन्न असताना, निम्नश्रेणीतील सेवेत, श्रेणीत किंवा पदावर त्यास पदावनत करण्यात येते,

[२६३](ब) निवृत्तीवेतनाचे नियमन करणाऱ्या नियमांनुसार त्याला अनुज्ञेय असणारे निवृत्तीवेतन कमी करण्यात येते किंवा रोखून ठेवण्यात येते किंवा कमाल निवृत्तीवेतन नाकारण्यात येते.

---

[२६०] ''मग तो शिस्तभंगविषयक प्राधिकरणाने काढलेला असो किंवा कोणत्याही अपीलीय अथवा पुनरीक्षण प्राधिकरणाने काढलेला असो,'' हा मजकूर वगळण्यात आला.

[२६१] ''महानगरपालिका कर्मचारी दक्षतारोध पार करण्यास अयोग्य असल्याच्या कारणावरुन समयश्रेणी वेतनावरील दक्षतारोधावर त्याचे वेतन थांबविण्यात येते.'' हा मजकूर वगळण्यात आला.

[२६२] ''अनु.क्र.(ब)'' या ऐवजी ''अनु.क्र.(अ)'' असा बदल करण्यात आला. तथापि, मजकूरामध्ये कोणताही बदल नाही.

[२६३] ''अनु.क्र.(क)'' या ऐवजी ''अनु.क्र.(ब)'' असा बदल करण्यात आला. तथापि, मजकूरामध्ये कोणताही बदल नाही.

[२६४](क) त्याच्या निलंबनाच्या कालावधीकरिता किंवा तो निलंबनाधीन असल्याचे मानले जाते त्या कालावधीकरिता किंवा त्यातील कोणत्याही भागाकरिता, त्याला द्यावयाचा निर्वाहभत्ता व इतर भत्ते निश्चित करण्यात येतात,

[२६५](ड) (एक) निलंबन कालावधीकरिता, किंवा

(दोन) त्याला बडतर्फ केल्याच्या, सेवेतून काढून टाकल्याच्या [२६६]**** किंवा त्याला निम्नश्रेणीच्या सेवेत, पदावर किंवा समयवेतन श्रेणीतील टप्प्यावर पदावनत केल्याच्या तारखेपासून, त्याला त्याच्या सेवेत, श्रेणीत किंवा पदावर पुन:स्थापित करण्याच्या किंवा पूर्ववत घेण्याच्या तारखेपर्यंतच कालावधीकरिता, त्याचे वेतन व भत्ते निश्चित करण्यात येतात, किंवा

[२६७](ई) त्याला निलंबित केल्याच्या तारखेपासून किंवा त्याला बडतर्फ केल्याच्या, सेवेतून काढून टाकल्याच्या [२६८]**** किंवा निम्नश्रेणीतील सेवेत, श्रेणीवर, पदावर, समयवेतनश्रेणीत किंवा समयवेतनश्रेणीतील टप्प्यावर पदावनत केल्याच्या तारखेपासून त्याला त्याच्या सेवेत, श्रेणीत किंवा पदावर पुनर्स्थापित केल्याच्या किंवा पूर्ववत घेतल्याचा कालावधी हा कोणत्याही प्रयोजनासाठी, त्याने कर्तव्यार्थ व्यतीत केलेला कालावधी मानला जाईल किंवा कसे, हे ठरविण्यात येते, असा आदेश,

**स्पष्टीकरण** ...... या नियमांमध्ये -

(एक) ''महानगरपालिका कर्मचारी'' या संज्ञेमध्ये महानगरपालिका सेवेत असण्याचे बंद झालेल्या व्यक्तीचाही समावेश होतो.

(दोन) ''निवृत्तीवेतन'' या संज्ञेमध्ये अतिरिक्त निवृत्तीवेतन, उपदान व अन्य कोणतेही सेवानिवृत्ती लाभ यांचा समावेश होतो.

---

[२६४] ''अनु.क्र.(ड)'' या ऐवजी ''अनु.क्र.(क)'' असा बदल करण्यात आला. तथापि, मजकूरामध्ये कोणताही बदल नाही.

[२६५] ''अनु.क्र.(ई)(एक)'' या ऐवजी ''अनु.क्र.(ड)(एक)'' असा बदल करण्यात आला. तथापि, मजकूरामध्ये कोणताही बदल नाही.

[२६६] ''किंवा सक्तीने सेवानिवृत्त केल्याच्या तारखेपासून'' हे शब्द वगळण्यात आले.

[२६७] ''अनु.क्र.(फ)'' या ऐवजी ''अनु.क्र.(ई)'' असा बदल करण्यात आला.

[२६८] ''किंवा सक्तीने सेवानिवृत्त केल्याच्या तारखेपासून'' हे शब्द वगळण्यात आले.

**१८. अपिलीय प्राधिकारी:-**

सर्वसाधारणपणे ज्या सक्षम [२६९]प्राधिकाऱ्याने शिक्षा ठोठावली असेल, त्या [२७०]प्राधिकाऱ्यापेक्षा निकट वरिष्ठ प्राधिकारी हा अपील सुनावणी घेऊ शकेल आणि त्यावर निर्णय घेऊ शकेल.

[२७१](१) शिक्षेचे आदेश खातेप्रमुखांनी पारित केले असतील तर त्या खात्याचे नियंत्रण असणाऱ्या उप आयुक्तांकडे अपील दाखल करण्यात यावे.

[२७२](२) जर शिक्षेचे आदेश उप आयुक्तांनी पारित केले असतील तर, अपील संबंधित खात्याच्या अतिरिक्त आयुक्तांकडे दाखल करण्यात यावे. अतिरिक्त आयुक्त सदर अपील स्वत: निकाली काढतील किंवा अन्य एक किंवा दोन उप आयुक्तांना ते निकाली काढण्याचे निर्देश देऊ शकतील.

[२७३](३) जर शिक्षेचे आदेश अतिरिक्त आयुक्तांनी पारित केले असतील तर अपील महानगरपालिका आयुक्तांकडे दाखल करण्यात यावे. सदर अपील महानगरपालिका आयुक्त स्वत: निकाली काढतील किंवा अन्य एक किंवा दोन अतिरिक्त आयुक्त किंवा दोन उप आयुक्त यांना ते निकाली काढण्याचे निर्देश देऊ शकतील.

[२७४](४) जेथे शिक्षादेश महानगरपालिका आयुक्त यांनी पारित केले असतील त्या प्रकरणी अपील महानगरपालिका आयुक्तांकडे दाखल होईल व महानगरपालिका आयुक्त एक किंवा दोन अतिरिक्त आयुक्त किंवा दोन उप आयुक्त यांना संबंधित अपिलाची सुनावणी घेऊन अभिप्रायासह निर्णयासाठी महानगरपालिका आयुक्तांना सादर करण्याचे किंवा सुनावणी घेऊन अपील निकाली काढण्याचे निर्देश देऊ शकतील.

---

[२६९] ''प्राधिकरणाने'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याने'' आणि [२७०] ''प्राधिकरणापेक्षा'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्यापेक्षा'' हे शब्द दाखल करण्यात आले.
[२७१] ''(१) शिक्षेचे आदेश खातेप्रमुखांनी पारित केले असतील तर त्या खात्याचे नियंत्रण असणाऱ्या उप आयुक्तांकडे अपील दाखल करण्यात यावे'', [२७२](२) जर शिक्षेचे आदेश उप आयुक्तांनी पारित केले असतील तर, अपील संबंधित खात्याच्या अतिरिक्त आयुक्तांकडे दाखल करण्यात यावे. अतिरिक्त आयुक्त सदर अपील स्वत: निकाली काढतील किंवा अन्य एक किंवा दोन उप आयुक्तांना ते निकाली काढण्याचे निर्देश देऊ शकतील, [२७३] (३) जर शिक्षेचे आदेश अतिरिक्त आयुक्तांनी पारित केले असतील तर अपील महानगरपालिका आयुक्तांकडे दाखल करण्यात यावे. सदर अपील महानगरपालिका आयुक्त स्वत: निकाली काढतील किंवा अन्य एक किंवा दोन अतिरिक्त आयुक्त किंवा दोन उप आयुक्त यांना ते निकाली काढण्याचे निर्देश देऊ शकतील, [२७४](४) जेथे शिक्षादेश महानगरपालिका आयुक्त यांनी पारित केले असतील त्या प्रकरणी अपील महानगरपालिका आयुक्तांकडे दाखल होईल व महानगरपालिका आयुक्त एक किंवा दोन अतिरिक्त आयुक्त किंवा दोन उप आयुक्त यांना संबंधित अपिलाची सुनावणी घेऊन अभिप्रायासह निर्णयासाठी महानगरपालिका आयुक्तांना सादर करण्याचे किंवा सुनावणी घेऊन अपील निकाली काढण्याचे निर्देश देऊ शकतील'' हा मजकूर नव्याने समाविष्ट करण्यात आला.

**१९. अपिलांकरिता कालमर्यादा:-**

ज्या आदेशाविरुध्द अपील करण्यात आले असेल त्या आदेशाची प्रत अपिलकर्त्याला मिळाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या कालावधीत असे अपील करू शकेल. परंतु [२७५]सेवेतून बडतर्फ आणि सेवेतून काढून टाकणे या शिक्षेविरूद्ध ६० दिवसांच्या कालावधीमध्ये अपील करू शकेल.

[२७६]****

**२०. अपिलाची पद्धती, स्वरूप, [२७७]आशय आणि अपील सादर करणे:-**

(१) अपील करणारी प्रत्येक व्यक्ती आपले अपील स्वतंत्रपणे आणि आपल्या स्वत:च्या नावाने करील आणि [२७८]संबंधित खाते प्रमुख आणि शिक्षादेश पारित करणाऱ्या प्राधिकाऱ्यामार्फतच ज्या [२७९]प्राधिकाऱ्याकडे ते सादर करावयाचे असेल त्या [२८०]प्राधिकाऱ्याला उद्देशून ते [२८१]करतील.

(२) हे अपील स्वयंपूर्ण असेल आणि त्यामध्ये, ज्यांवर अपिलकर्त्याचा विशेष भर असेल अशा सर्व महत्त्वाच्या विधानांचा आणि युक्तीवादाचा समावेश असेल [२८२]त्यामध्ये पूर्वीच मांडलेल्या मुद्दयांचाच पुनर्उच्चार नसावा, पुनर्विचाराकरिता नवीन व पुरेसे मुद्दे असावेत, परंतु त्यात वापरलेली भाषा अवमानकारक किंवा अशिष्ट नसेल,

(३) [२८३]ठराविक मुदतीत अपील सादर न केल्यास त्याची सयुक्तिक व समाधानकारक कारणे नमूद करण्यात यावीत.

मात्र कोणत्याही परिस्थितीत 'जबर शिक्षेबाबत' ज्या आदेशाविरूध्द अपील करण्यात येत असेल त्या आदेशाची प्रत मिळाल्याच्या दिनांकापासून १२० दिवसांनंतर कोणतेही अपील दाखल करता येणार नाही.

---

[२७५] ''जबर शिक्षेविरूद्ध'' या शब्दाऐवजी ''सेवेतून बडतर्फ आणि सेवेतून काढून टाकणे या शिक्षेविरूद्ध'' हे शब्द दाखल करण्यात आले. [२७६]''परंतु, अपीलकर्त्याला ठराविक मुदतीत अपील सादर न करण्यास पुरेसे कारण होते याबाबत अपीलीय प्राधिकरणाची खात्री पटली असेल तर उक्त कालावधी संपल्यानंतरही ते प्राधिकरण अपील स्वीकारु शकेल.'' हा मजकूर वगळण्यात आला. [२७७] ''आणि अपील सादर करणे'' हे जादा शब्द दाखल करण्यात आले. [२७८] ''संबंधित खाते प्रमुख आणि शिक्षादेश पारित करणाऱ्या प्राधिकाऱ्यामार्फतच'' हे शब्द दाखल करण्यात आले.
[२७९] ''प्राधिकरणाकडे'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याकडे''. [२८०]''प्राधिकरणाला'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याला'', [२८१] ''करील'' या शब्दाऐवजी ''करतील'' हे शब्द दाखल करण्यात आले. [२८२]त्यामध्ये पूर्वीच मांडलेल्या मुद्दयांचाच पुनर्उच्चार नसावा, पुनर्विचाराकरिता नवीन व पुरेसे मुद्दे असावेत,'' हा मजकूर समाविष्ट करण्यात आला. [२८३] ''प्रत्येक अपील ज्या खात्याच्या कार्यपध्दतीशी संबंधित असेल तर त्या खातेप्रमुखाच्या अभिप्रायाचा समावेश करुनच अपील अपिलीय प्राधिकरणाला सादर करेल'' या मजकूराऐवजी ''ठराविक मुदतीत अपील सादर न केल्यास त्याची संयुक्तिक व समाधानकारक कारणे नमूद करण्यात यावीत. मात्र कोणत्याही परिस्थितीत 'जबर शिक्षेबाबत' ज्या आदेशाविरूध्द अपील करण्यात येत असेल त्या आदेशाची प्रत मिळाल्याच्या दिनांकापासून १२० दिवसांनंतर कोणतेही अपील दाखल करता येणार नाही'' हा मजकूर नव्याने समाविष्ट करण्यात आला.

[२८४]**नवीन तरतूद:-**

(४) अपिलाची प्रत थेट अपील प्राधिकाऱ्यांनाही सादर करण्यात येईल.

[२८५]**२१.अपील सादर करणे:-******

[२८६]**२१. अपील पुढे पाठविणे:-**

[२८७](१) वरीलप्रमाणे अपील प्राप्त झाल्यानंतर संबंधित खाते प्रमुख ते प्रमुख अधिकारी (चौकशी) यांच्यामार्फत संबंधित शिक्षादेश पारित करणारे प्राधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांना विनाविलंब सादर करतील. असे अपील सादर करताना त्यामध्ये अवमानकारक व अशिष्ट भाषा वापरली असेल आणि/किंवा ते विहित मुदतीत दाखल करण्यात आले नसेल, तर त्या बाबी निदर्शनास आणतील.

[२८८](२) ज्या आदेशाविरूध्द अपील करण्यात आले असेल तो आदेश काढणारे प्राधिकारी, अपिलाची प्रत मिळाल्यानंतर विनाविलंब अपिलीय प्राधिकरणाकडून कोणताही निर्देश मिळण्याची वाट न पाहता त्यावरील, सदर अपील संयुक्तिक व समाधानकारक कारणांशिवाय विहित मुदतीत दाखल झाले नसल्यास आणि/ किंवा त्यामध्ये अशिष्ट व अवमानकारक भाषेचा वापर करण्यात आला असल्यास तसेच त्यामध्ये पुनर्विचारार्थ नवीन मुद्दा नसल्यास ते रोखून ठेवावे किंवा कसे, याबाबतच्या आपल्या भाष्यासह आणि संबंधित अभिलेखासह अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे पाठवतील.

---

[२८४] **नवीन तरतूद:-**

(४) अपिलाची प्रत थेट अपील प्राधिकाऱ्यांनाही सादर करण्यात येईल.'' हा मजकूर नव्याने समाविष्ट करण्यात आला.

[२८५] ''**२१. अपील सादर करणे:-**

(१) प्रत्येक अपील ज्या आदेशाविरुध्द ते केले असेल तो आदेश काढणाऱ्या प्राधिकरणाला सादर करण्यात येईल. परंतु

(अ) असे प्राधिकरण हे, अपीलकर्ता ज्या कार्यालयात नोकरीला असेल त्या कार्यालयाचा प्रमुख नसेल, किंवा

(ब) अपीलकर्ता सेवेत असण्याचे बंद झाले असेल आणि सेवेत असण्याचे बंद होण्याच्या लगतपूर्वी तो ज्या कार्यालयात काम करीत होता त्यावेळी असे प्राधिकरण हे, त्याच्या कार्यालयाचा प्रमुख नसेल, किंवा

(२) अपीलाची एक प्रत थेट अपील प्राधिकरणालाही सादर करण्यात येईल.'' हा संपूर्ण नियम वगळण्यात आला.

[२८६] ''अनु.क्र.२२'' ऐवजी ''अनु.क्र.२१'' असा बदल करण्यात आला.

[२८७] ''(१) वरीलप्रमाणे अपील प्राप्त झाल्यानंतर संबंधित खाते प्रमुख ते प्रमुख अधिकारी (चौकशी) यांच्यामार्फत संबंधित शिक्षादेश पारित करणारे प्राधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांना विनाविलंब सादर करतील. असे अपील सादर करताना त्यामध्ये अवमानकारक व अशिष्ट भाषा वापरली असेल आणि/किंवा ते विहित मुदतीत दाखल करण्यात आले नसेल, तर त्या बाबी निदर्शनास आणतील.'' हा मजकूर नव्याने समाविष्ट करण्यात आला.

[२८८] ''ज्या आदेशाविरुध्द अपील करण्यात आले असेल तो आदेश काढणारे प्राधिकरण, अपीलाची प्रत मिळाल्यानंतर विनाविलंब अपिलीय प्राधिकरणाकडूनकोणताही निदेश मिळण्याची वाट न पाहता प्रत्येक अपील, त्यावरील आपल्या भाष्यासह आणि सबध्द अभिलेखासह अपीलीय प्राधिकरणाकडे पाठवील.'' या मजकूराऐवजी ''(२) ज्या आदेशाविरूध्द अपील करण्यात आले असेल तो आदेश काढणारे प्राधिकारी, अपिलाची प्रत मिळाल्यानंतर विनाविलंब अपिलीय प्राधिकरणाकडून कोणताही निर्देश मिळण्याची वाट न पाहता त्यावरील, सदर अपील संयुक्तिक व समाधानकारक कारणांशिवाय विहित मुदतीत दाखल झाले नसल्यास आणि/ किंवा त्यामध्ये अशिष्ट व अवमानकारक भाषेचा वापर करण्यात आला असल्यास तसेच त्यामध्ये पुनर्विचारार्थ नवीन मुद्दा नसल्यास ते रोखून ठेवावे किंवा कसे, याबाबतच्या आपल्या भाष्यासह आणि संबंधित अभिलेखासह अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे पाठवतील.'' हा मजकूर नव्याने समाविष्ट करण्यात आला.'' हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

**[२८९]२२. अपिलावर विचारविनिमयः- [२९०](नवीन तरतूद)**

[२९१](१) (अ) विहित मुदतीत अपील दाखल झाले नसल्यास त्याकरिता अपिलकर्त्यांनी समाधानकारक व संयुक्तिक कारण दाखविले नसल्याचे किंवा/तसेच अपीलामध्ये अवमानकारक व अशिष्ट भाषा वापरली असल्याचे किंवा/तसेच त्यामध्ये केवळ पूर्वीचेच मुद्दे मांडल्याचे व पुनर्विचारार्थ नवीन मुद्दा नसल्याचे अपिलीय अधिकाऱ्यांचे मत झाल्यास अपील प्रथमदर्शनीच फेटाळण्यात येईल. तथापि, याची कारणे अपिलकर्त्याला कळविण्यात येतील.

[२९२](ब) जबर शिक्षेविरूध्द अपील दाखल करण्यास संयुक्तिक कारणाकरिता विलंब झाला असेल, तर तो क्षमापित करण्याचे अधिकार खालीलप्रमाणे असतील:-

(१) ६० ते ७५ दिवसांपर्यत - संबंधित उप आयुक्त

(२) ७५ ते ९० दिवसांपर्यत - संबंधित अतिरिक्त आयुक्त

(३) ९० ते १२० दिवसांपर्यत- मा.महानगरपालिका आयुक्त

[२९३](क) निलंबनाचा आदेश समर्थनीय आहे किंवा नाही यावर विचार करील आणि त्यानुसार तो, आदेश कायम ठेवील किंवा रद्द करील.

---

[२८९] ''अनु.क्र.२३'' ऐवजी ''अनु.क्र.२२'' असा बदल करण्यात आला.

[२९०] ''(नवीन तरतूद)'' हे शब्द दाखल करण्यात आले.

[२९१] ''(१) निलंबनाच्या आदेशाविरूध्द केलेल्या अपीलाच्या बाबतीत अपिलीय प्राधिकरण, या नियमांतील नियम ४ च्या तरतूदींना अनुलक्षून आणि प्रकरणाची परिस्थिती विचारात घेऊन, निलंबनाचा आदेश समर्थनीय आहे किंवा नाही यावर विचार करील आणि त्यानुसार तो, आदेश कायम ठेवील किंवा रद्द करील'' या मजकूराऐवजी ''(१) (अ) विहित मुदतीत अपील दाखल झाले नसल्यास त्याकरिता अपिलकर्त्यांनी समाधानकारक व संयुक्तिक कारण दाखविले नसल्याचे किंवा/तसेच अपीलामध्ये अवमानकारक व अशिष्ट भाषा वापरली असल्याचे किंवा/तसेच त्यामध्ये केवळ पूर्वीचेच मुद्दे मांडल्याचे व पुनर्विचारार्थ नवीन मुद्दा नसल्याचे अपिलीय अधिकाऱ्यांचे मत झाल्यास अपील प्रथमदर्शनीच फेटाळण्यात येईल. तथापि, याची कारणे अपिलकर्त्याला कळविण्यात येतील.'' हा मजकूर नव्याने समाविष्ट करण्यात आला.

[२९२] ''(ब) जबर शिक्षेविरूध्द अपील दाखल करण्यास संयुक्तिक कारणाकरिता विलंब झाला असेल, तर तो क्षमापित करण्याचे अधिकार खालीलप्रमाणे असतील:-

(१) ६० ते ७५ दिवसांपर्यत - संबंधित उप आयुक्त

(२) ७५ ते ९० दिवसांपर्यत - संबंधित अतिरिक्त आयुक्त

(३) ९० ते १२० दिवसांपर्यत- मा.महानगरपालिका आयुक्त'' हा मजकूर नव्याने समाविष्ट करण्यात आला.

[२९३] ''(क) निलंबनाचा आदेश समर्थनीय आहे किंवा नाही यावर विचार करील आणि त्यानुसार तो, आदेश कायम ठेवील किंवा रद्द करील.'' हा मजकूर नव्याने समाविष्ट करण्यात आला.

(२) ज्या नियमांतील नियम क्र.५ (अ) व ५ (ब) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षांपैकी कोणतीही शिक्षा देणाऱ्या किंवा त्या नियमान्वये दिलेली कोणतीही शिक्षा वाढवणाऱ्या आदेशाविरुध्द अपील केले असेल [२९४]व अपिलकर्त्याने अपिलामध्ये त्याच्याविरुध्दच्या चौकशी प्रक्रियेत महत्त्वाची विसंगती किंवा अनियमितता होऊन त्याचा अपिलकर्त्यावर प्रतिकूल परिणाम झाल्याचे निदर्शनास आणले असल्यास, त्याबाबतीत अपिलीय प्राधिकारी-

(अ) [२९५]अपिलकर्त्याने अपिलामध्ये त्याच्याविरुध्दच्या चौकशी प्रक्रियेत महत्त्वाची विसंगती किंवा अनियमितता होऊन त्याचा अपिलकर्त्यावर प्रतिकूल परिणाम झाल्याचे निदर्शनास आणले असल्यास, या नियमांमध्ये घालून दिलेल्या कार्यपध्दतीचे अनुपालन केले आहे किंवा कसे, आणि तसे केले नसल्यास, असे अनुपालन न केल्यामुळे भारताच्या संविधानाच्या कोणत्याही तरतुदींचा भंग झाला आहे, किंवा कसे किंवा न्यायात कसूर झाली आहे किंवा कसे,

(ब) शिस्तभंगविषयक प्राधिकरणाने काढलेल्या निष्कर्षाचे अभिलेखातील पुराव्यामुळे समर्थन होते किंवा कसे, आणि

(क) दिलेली शिक्षा किंवा वाढीव शिक्षा ही पुरेशी आहे किंवा कसे, अपुरी आहे किंवा कसे, अथवा कडक आहे किंवा कसे, याबाबत विचार करील, [२९६]संपूर्ण मूळ चौकशी बाजूला सारुन नव्याने किंवा पर्यायाने चौकशी प्रक्रियेत ज्या टप्प्यावर विसंगती किंवा अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले असेल त्या टप्प्यापासून चौकशी प्रकिया पुन्हा चालू करण्याचे आदेश पारित करू शकतील, [२९७]अन्यथा-

(एक) शिक्षा कायम करणारा, वाढवणारा, कमी करणारा किंवा रद्द करणारा आदेश, किंवा

---

[२९४] ''त्याबाबतीत अपिलीय प्राधिकरण'' या शब्दांऐवजी ''व अपिलकर्त्याने अपिलामध्ये त्याच्याविरुध्दच्या चौकशी प्रक्रियेत महत्त्वाची विसंगती किंवा अनियमितता होऊन त्याचा अपिलकर्त्यावर प्रतिकूल परिणाम झाल्याचे निदर्शनास आणले असल्यास, त्याबाबतीत अपिलीय प्राधिकारी-'' हा मजकूर नव्याने समाविष्ट करण्यात आला.

[२९५] नियम क्र.२२ मधील पोटनियम (२)मधील (अ) मध्ये ''अपिलकर्त्याने अपिलामध्ये त्याच्याविरुध्दच्या चौकशी प्रक्रियेत महत्त्वाची विसंगती किंवा अनियमितता होऊन त्याचा अपिलकर्त्यावर प्रतिकूल परिणाम झाल्याचे निदर्शनास आणले असल्यास'' हा मजकूर नव्याने समाविष्ट करण्यात आला.

[२९६] ''संपूर्ण मूळ चौकशी बाजूला सारुन नव्याने किंवा पर्यायाने चौकशी प्रक्रियेत ज्या टप्प्यावर विसंगती किंवा अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले असेल त्या टप्प्यापासून चौकशी प्रकिया पुन्हा चालू करण्याचे आदेश पारित करू शकतील,'' हा मजकूर नव्याने समाविष्ट करण्यात आला.

[२९७] ''आणि'' या शब्दाऐवजी ''अन्यथा'' हा शब्द दाखल करण्यात आला.

(दोन) ज्याविरुध्द अपील करण्यात आले असेल तो आदेश काढणाऱ्या [२९८]प्राधिकाऱ्याकडे प्रस्तुत प्रकरण, त्या प्रकरणाची परिस्थिती पाहता, त्यास योग्य वाटतील अशा निदेशासह पाठवणारा आदेश काढील, परंतु,

(एक) अपिलीय [२९९]प्राधिकारी, ते स्वत: किंवा ज्याविरुध्द अपील करण्यात आले असेल तो आदेश देणारे [३००]प्राधिकारी, त्या प्रकरणी जी वाढीव शिक्षा करण्यास सक्षम [३०१]नसतील अशी कोणतीही वाढीव शिक्षा [३०२]**** देणार नाही,

(दोन) अपिलीय [३०३]प्राधिकाऱ्याने जी वाढीव शिक्षा देण्याचे योजिले असेल ती जबर शिक्षांपैकी असेल आणि प्रस्तुत प्रकरणी, नियम ८ अन्वये करावयाची चौकशी आधीच करण्यात आलेली नसेल तर, अपिलीय [३०४]प्राधिकारी नियम १३ च्या तरतुदीस अधीन राहून, स्वत:च अशी चौकशी करील किंवा नियम ८ च्या तरतूदीनुसार अशी चौकशी करण्यात यावी असे निर्देश देईल, आणि त्यानंतर, अशा चौकशीची कार्यवाही विचारात घेऊन त्यास योग्य वाटतील असे आदेश काढील.

(तीन) अपिलीय [३०५]प्राधिकाऱ्याने जी वाढीव शिक्षा देण्याचे योजिले असेल ती जबर शिक्षांपैकी एक असेल आणि या नियमांतील नियम क्र.८ अन्वये करावयाची चौकशी प्रस्तुत प्रकरणी पूर्वीच करण्यात आलेली असेल तर अपिलीय प्राधिकारी [३०६]**** [३०७]त्यांना योग्य वाटतील असे आदेश [३०८]देतील.

[३०९]तथापि, शिक्षेत वाढ करण्यापूर्वी अपीलकर्त्याला प्रस्तावित वाढीव शिक्षेसंबंधात कारणे दाखविण्याची वाजवी संधी देण्यात यावी.

---

[२९८] ''प्राधिकरणाकडे'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याकडे''. [२९९,- ३००] ''प्राधिकरण'' या शब्दाऐवजी ''प्राधिकारी''.

[३०१] ''नसते'' या शब्दाऐवजी ''नसतील'' हे शब्द दाखल करण्यात आले.

[३०२] ''ते'' हा शब्द वगळण्यात आला.

[३०३] ''प्राधिकरणाने'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याने''. [३०४] ''प्राधिकरण'' या शब्दाऐवजी ''प्राधिकारी''.

[३०५] ''प्राधिकरणाने'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याने''हे शब्द दाखल करण्यात आले.

[३०६] ''(महानगरपालिका कर्मचाऱ्याला करावयाची वाढीव शिक्षा नमूद करुन नोटीस मिळाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत किंवा त्यानंतर परवानगी वाढीव शिक्षेबद्दल त्याची इच्छा असेल त्याप्रमाणे अभिवेदन सादर करण्यास फर्माविणारी नोटीस महानगरपालिका कर्मचाऱ्यावर बजावली पाहिजे)'' हा मजकूर वगळण्यात आला.

[३०७] ''त्याला'' या शब्दाऐवजी ''त्यांना'' आणि [३०८] ''देईल'' या शब्दाऐवजी ''देतील''हे शब्द दाखल करण्यात आले.

[३०९] ''तथापि, शिक्षेत वाढ करण्यापूर्वी अपीलकर्त्याला प्रस्तावित वाढीव शिक्षेसंबंधात कारणे दाखविण्याची वाजवी संधी देण्यात यावी.'' हा मजकूर नव्याने समाविष्ट करण्यात आला.

(चार) [३१०]****

(३) या नियमांतील नियम १७ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही आदेशांविरुध्द केलेल्या अपिलामध्ये अपिलीय प्राधिकारी प्रकरणाच्या संपूर्ण परिस्थितीचा विचार करील आणि त्याला न्याय व नि:पक्षपाती वाटतील असे आदेश काढील.

**[३११]२३. अपिलातील आदेशांची अंमलबजावणी:-**

ज्या आदेशाविरुध्द अपील करण्यात आले असेल तो आदेश काढणारे [३१२]प्राधिकारी, अपिलीय [३१३]प्राधिकाऱ्याने संमत केलेले आदेश अंमलात [३१४]आणण्याची कार्यवाही करवून घेतील.

---

[३१०] ''(चार) महानगरपालिका कर्मचाऱ्याला जी वाढीव शिक्षा करण्याचे योजिले असेल ती शिक्षा नमूद करुन अशी नोटीस मिळाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत किंवा त्यानंतर परवानगी देण्यात येईल अशा आणखी पंधरा दिवसांपेक्षा अधिक नसेल इतका कालावधी अशा प्रस्तावित वाढीव शिक्षेसंबंधी त्याची इच्छा असेल त्याप्रमाणे अभिवेदन सादर करण्यास फर्माविणारी नोटीस बजावलेली असल्याखेरील इतर कोणत्याही प्रकरणामध्ये वाढीव शिक्षा ठोठावणारा आदेश काढता येणार नाही.'' हा मजकूर वगळण्यात आला.

[३११] ''अनु.क्र.२४'' ऐवजी ''अनु.क्र.२३'' असा बदल करण्यात आला.

[३१२] ''प्राधिकरण'' या शब्दाऐवजी ''प्राधिकारी'' आणि

[३१३] ''प्राधिकरणाने'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्याने''हे शब्द दाखल करण्यात आले.

[३१४] ''आणील'' या शब्दाऐवजी ''आणण्याची कार्यवाही करवून घेतील''हे जादा शब्द दाखल करण्यात आले.

## भाग सहा - पुनर्विलोकन

[३१५]**२४. पुनर्विलोकन:-**

(१) [३१६]या नियमांमध्ये काहीही नमूद केले असले तरी एखादया प्रकरणी अपील दाखल झाले नसले तरी महानगरपालिका आयुक्त स्वत:हून किंवा खाते प्रमुखांनी सादर केलेल्या प्रकरणी, दुय्यम प्राधिकाऱ्यांनी पारित केलेल्या कोणत्याही शिक्षादेशाचे पुनर्विलोकन करू शकतील आणि

(अ) तो आदेश कायम करू [३१७]शकतील, त्यात सुधारणा करू [३१८]शकतील आणि रद्द करू [३१९]शकतील किंवा

(ब) त्या आदेशाद्वारे देण्यात आलेली शिक्षा कायम, कमी, वाढीव किंवा रद्द करू [३२०]शकतील किंवा जेथे कोणतीही शिक्षा देण्यात आलेली नसेल तेथे शिक्षा देऊ [३२१]शकतील, किंवा

(क) त्या प्रकरणाच्या परिस्थितीनुरुप त्याला योग्य वाटेल अशी आणखी चौकशी करण्याचा निदेश देऊन ते प्रकरण, ज्याने आदेश दिला असेल त्या प्राधिकरणाकडे किंवा अन्य कोणत्याही प्राधिकरणाकडे परत पाठवू [३२२]शकतील, किंवा

(ड) त्याला योग्य वाटतील असे इतर आदेश काढू [३२३]शकतील.

[३२४]****

---

[३१५] ''अनु.क्र.२५'' ऐवजी ''अनु.क्र.२४'' असा बदल करण्यात आला.

[३१६] ''या नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, महानगरपालिका आयुक्त किंवा या नियमांतील नियम ५ (अ) व ५ (ब) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षापैकी कोणतीही शिक्षा देणाऱ्या आदेशाविरुध्द केलेले अपील ज्या प्राधिकरणाकडे करता येते असे कोणतेही प्राधिकरण, कोणत्याही वेळी स्वत:हून किंवा अन्यथा, कोणत्याही चौकशीचा अभिलेख मागवू शकेल आणि या नियमांनुसार किंवा या नियमांतील नियम २९ अन्वये निरसित केलेल्या नियमानुसार देण्यात आलेल्या ज्या आदेशांविरुध्द अपील करता येते, परंतु असे कोणतेही अपील करण्यात आलेले नसेल अशा कोणत्याही आदेशाचे अथवा त्या आदेशाविरुध्द कोणतेही अपील करता येत नाही अशा प्रकरणी, जेथे आवश्यक असेल तेथे आयोगाशी विचारविनिमय केल्यानंतर अशा आदेशांचे पुनर्विलोकन करु शकेल आणि'' या मजकूराऐवजी ''या नियमांमध्ये काहीही नमूद केले असले तरी एखादया प्रकरणी अपील दाखल झाले नसले तरी महानगरपालिका आयुक्त स्वत:हून किंवा खाते प्रमुखांनी सादर केलेल्या प्रकरणी, दुय्यम प्राधिकाऱ्यांनी पारित केलेल्या कोणत्याही शिक्षादेशाचे पुनर्विलोकन करू शकतील आणि'' हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३१७ ते ३२३] येथे ''शकेल'' या शब्दाऐवजी ''शकतील'' हे शब्द दाखल करण्यात आले.

[३२४] ''परंतु, संबंधित महानगरपालिका कर्मचाऱ्याला त्याला करावयाच्या प्रस्तावित शिक्षेविरुध्द अभिवेदन करण्याची वाजवी संधी देण्यात आल्याखेरीज, कोणतेही पुनर्विलोकन प्राधिकरण, कोणतीही शिक्षा करणारा किंवा कोणत्याही शिक्षेत वाढ करणारा कोणताही आदेश काढणार नाही, आणि ज्याबाबतीत कोणतीही जबर शिक्षा द्यावयाची किंवा ज्या आदेशाचे पुनर्विलोकन करावयाचे आहे अशा आदेशाद्वारे केलेली शिक्षा वाढवून कोणतीही जबर शिक्षा करण्याचे योजिलेले असेल त्याबाबतीत या नियमांतील नियम ८ मध्ये घालून दिलेल्या पध्दतीने चौकशी करण्यात आल्याशिवाय अशी कोणतीही शिक्षा करण्यात येणार नाही.

परंतु, आणखी असे की - या नियमांतील नियम ५ (अ) व ५ (ब) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षापैकी कोणतीही शिक्षा देणाऱ्या आदेशाविरुध्द ज्या प्राधिकरणाकडे अपील करता येते, असे प्राधिकरण.

(एक) अपिलातील आदेश ज्याने काढला असेल ते प्राधिकरण किंवा,

(दोन) ज्या बाबतीत अपील दाखल करण्यात आलेले नसेल परंतु ज्या प्राधिकरणाकडे अपील करता आले असते असे प्राधिकरण, त्याला दुय्यम असल्याखेरीज अन्यथा, पुनरिक्षणाच्या अधिकारांचा वापर करणार नाही.'' हा मजकूर वगळण्यात आला.

(२) पुनर्विलोकनसंबंधी कोणतीही कार्यवाही -

(एक) अपिलाकरिता असलेली मुदत संपेपर्यंत,

(दोन) असे कोणतेही अपील दाखल करण्यात आले असेल त्याबाबतीत, ते निकालात काढले जाईपर्यंत, सुरू करण्यात येणार नाही.

(३) पुनर्विलोकनासाठी करण्यात आलेल्या अर्जावर तो या नियमांखाली करण्यात आलेले अपील आहे, असे मानून त्याच पध्दतीने कार्यवाही करण्यात येईल, मात्र त्यावर विचार करण्याचा कालावधी [३२५]पुनर्विलोकन करावयाच्या आदेशाची प्रत अर्जदाराला देण्यात आल्याच्या तारखेपासून ६ महिने एवढा असेल.

परंतु, संबंधित महानगरपालिका कर्मचाऱ्याला, त्याला करावयाच्या प्रस्तावित शिक्षेविरूद्ध अभिवेदन करण्याची वाजवी संधी देण्यात आल्याखेरीज, महानगरपालिका आयुक्त, कोणतीही शिक्षा करणारा किंवा कोणत्याही शिक्षेत वाढ करणारा कोणताही आदेश काढणार [३२६]नाहीत किंवा नियम ५ (ब) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जबर शिक्षापैकी कोणतीही शिक्षा देण्याचे किंवा ज्या आदेशाचे पुनर्विलोकन करावयाचे आहे अशा आदेशाद्वारे केलेली किरकोळ शिक्षा वाढवून कोणतीही जबर शिक्षा करण्याचे योजिलेले असेल, आणि त्या प्रकरणी, नियम ८ अन्वये करावयाची चौकशी आधीच करण्यात आली नसेल त्याबाबतीत, नियम १३ च्या तरतूदीस अधीन राहून, नियम ८ मध्ये घालून दिलेल्या पध्दतीने चौकशी करण्यात आल्याशिवाय [३२७]**** अशी कोणतीही शिक्षा करण्यात येणार नाही.

[३२८]**स्प्टीकरण ****

---

[३२५] ''पुनरिक्षण'' या शब्दाऐवजी ''पुनर्विलोकन'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[३२६] ''नाही'' या शब्दाऐवजी ''नाहीत'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[३२७] ''आणि आवश्यक तेथे आयोगाशी विचारविनिमय केल्याशिवाय'' हे शब्द वगळण्यात आले.

[३२८] ''**स्पष्टीकरण-** ज्या प्रकरणी अपील दाखल केले गेले नाही किंवा अपील निकाली काढले गेलेले आहे अशा कोणतेही चौकशी प्रकरण महानगरपालिका आयुक्त स्वत: किंवा खातेप्रमुखांनी पुनर्विलोकनासाठी सादर केलेल्या आणि ठोठाविण्यात आलेल्या शिक्षेबाबत पुनर्विलोकन करु शकतील. तथापि, शिक्षा वाढविण्यापूर्वी संबंधित कर्मचाऱ्याला 'कारणे दाखवा नोटीसी' द्वारे संधी देण्यात येईल.'' हा मजकूर वगळण्यात आला.

## भाग सात – संकीर्ण

**[३२९]२५. आदेश, नोटिसा इत्यादींची बजावणी:-**

या नियमांन्वये देण्यात येणारा प्रत्येक आदेश, नोटीस आणि इतर आदेशिका, या संबंधित महानगरपालिका कर्मचाऱ्याला व्यक्तिश: देण्यात येतील, [३३०]कर्मचाऱ्याकडून लेखी स्वीकृती मिळेल अशा कोणत्याही प्रकारे पाठविण्यात येतील. [३३१]तांतडीच्या प्रकरणी आरोपपत्र, सूचना, आदेश किंवा पत्रव्यवहाराची प्रत इलेक्ट्रॉनिक मार्गाने (म्हणजे महानगरपालिकेला ज्ञात असलेल्या, कर्मचाऱ्याच्या ई-मेल पत्त्यावर) बजाविण्यात यावी.

तथापि, कार्यालयीन पत्रव्यवहार स्वीकारण्यास नकार देणे हा स्वतंत्र शिस्तभंग मानून उचित कारवाई करण्यात येऊ शकते.

मात्र, अशाप्रकारे पाठविलेले आदेश, सूचना किंवा इतर पत्रव्यवहार कर्मचाऱ्याने स्वीकारले नाही, स्वीकारण्यास टाळाटाळ केली किंवा स्वीकारण्यास नकार दिल्यास तो महानगरपालिकेच्या अभिलेखात नोंदविलेल्या कर्मचाऱ्याच्या अंतिम ज्ञात रहिवासी पत्त्यावर स्वीकृतीदेय पत्रव्यवहाराच्या प्रकाराने पाठविला असल्यास तो त्याच्यावर त्याने टाळाटाळ केल्याच्या / स्वीकारण्यास नकार देण्याच्या किंवा अस्वीकृतीबाबतच्या टपाल खात्याच्या अभिप्रायाच्या दिनांकाला बजाविला गेल्याचे मानण्यात येईल.

---

[३२९] ''अनु.क्र.२६'' या ऐवजी ''अनु.क्र.२५'' असा बदल करण्यात आला.

[३३०] ''किंवा त्यांच्याकडे नोंदणीकृत डाकेने पाठविण्यात येतील'' या मजकुराऐवजी ''कर्मचाऱ्याकडून लेखी स्वीकृती मिळेल अशा कोणत्याही प्रकारे पाठविण्यात येतील'' हा मजकूर नव्याने समाविष्ट करण्यात आला.
''तांतडीच्या प्रकरणी आरोपपत्र, सूचना, आदेश किंवा पत्रव्यवहाराची प्रत इलेक्ट्रॉनिक मार्गाने (म्हणजे महानगरपालिकेला ज्ञात असलेल्या, कर्मचाऱ्याच्या ई-मेल पत्त्यावर) बजाविण्यात यावी.

३३१ ''तथापि, कार्यालयीन पत्रव्यवहार स्वीकारण्यास नकार देणे हा स्वतंत्र शिस्तभंग मानून उचित कारवाई करण्यात येऊ शकते.
मात्र, अशाप्रकारे पाठविलेले आदेश, सूचना किंवा इतर पत्रव्यवहार कर्मचाऱ्याने स्वीकारले नाही, स्वीकारण्यास टाळाटाळ केली किंवा स्वीकारण्यास नकार दिल्यास तो महानगरपालिकेच्या अभिलेखात नोंदविलेल्या कर्मचाऱ्याच्या अंतिम ज्ञात रहिवासी पत्त्यावर स्वीकृतीदेय पत्रव्यवहाराच्या प्रकाराने पाठविला असल्यास तो त्याच्यावर त्याने टाळाटाळ केल्याच्या / स्वीकारण्यास नकार देण्याच्या किंवा अस्वीकृतीबाबतच्या टपाल खात्याच्या अभिप्रायाच्या दिनांकाला बजाविला गेल्याचे मानण्यात येईल.'' हा मजकूर नव्याने समाविष्ट करण्यात आला.

**[३३२]२६. कालमर्यादा शिथिल करण्याचा आणि उशीर माफ करण्याचा अधिकारीः-**

या नियमांमध्ये स्पष्टपणे अन्यथा तरतूद केली असेल ते खेरीजकरुन या नियमांन्वये कोणताही आदेश देण्यास सक्षम असणारे [३३३]प्राधिकारी, सबळ व पुरेशा कारणांकरिता किंवा पुरेशी सबब दर्शविण्यात आली असेल तर, या नियमान्वये विनिर्दिष्ट करण्यात आलेला कालावधी वाढवून देऊ शकेल किंवा झालेला कोणताही विलंब माफ करू [३३४]शकतील.

**[३३५]२८.आयोगाच्या सल्ल्याची प्रत पुरवणेः-******

**[३३६]२७. निरसन व व्यावृत्तीः-**

(१) या नियमांचा प्रारंभ झाल्यानंतर पुढे नमूद केलेले नियम म्हणजेच -

(एक) या नियमांद्वारे तरतूद केलेल्या बाबीशी संबंधित असतील तेथवर बृहन्मुंबई महानगरपालिका (सेवा) १९८९, बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा वर्तणूक, शिस्त व अपील नियम, इ.

(अ) हे नियम निरसित केल्यामुळे देण्यात आलेल्या कोणत्याही अधिसूचनांच्या किंवा आदेशांच्या पूर्वीच्या प्रवर्तनावर किंवा अशा निरसित नियमांन्वये करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टींवर किंवा कोणत्याही कार्यवाहीवर परिणाम होणार नाही.

(ब) या नियमांच्या प्रारंभी, अशा निरसित नियमांखाली प्रलंबित असलेली कोणतीही कार्यवाही पुढे चालू ठेवण्यात येईल आणि अशी कार्यवाही जणू काही या नियमांखालील कार्यवाहीच आहे असे मानून शक्य असेल तेथवर, या नियमांच्या तरतूदींनुसार निकालात काढण्यात येईल.

---

[३३२] ''अनु.क्र.२७'' या ऐवजी ''अनु.क्र.२६'' असा बदल करण्यात आला.

[३३३] ''प्राधिकरण'' या शब्दाऐवजी ''प्राधिकारी'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[३३४] ''शकेल '' या शब्दाऐवजी ''शकतील'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[३३५] ''**२८. आयोगाच्या सल्ल्याची प्रत पुरवणेः-**

या नियमांमध्ये तरतूद केल्यानुसार ज्या ज्या वेळी, आयोगाशी विचारविनिमय करण्यात येतो त्या त्या वेळी, आयोगाकडून घेतलेल्या सल्ल्याची एक प्रत आणि असा सल्ला स्वीकारण्यात आला नसेल त्यावेळी तो न स्वीकारण्याबाबतच्या कारणाचे संक्षिप्त निवेदन व आदेश देणाऱ्या प्राधिकरणाने त्या प्रकरणी काढलेल्या आदेशाची एक प्रत संबंधित महानगरपालिका कर्मचाऱ्याला देण्यात येईल.'' हा संपूर्ण नियम वगळण्यात आला.

[३३६] ''अनु.क्र.२९'' या ऐवजी ''अनु.क्र.२७'' असा बदल करण्यात आला. तथापि, मजकूरामध्ये कोणताही बदल नाही.

(२) हे नियम लागू होत असलेल्या कोणत्याही व्यक्तीला, या नियमांच्या प्रारंभापूर्वी अंमलात असलेले नियम, अधिसूचना किंवा आदेश याअन्वये त्यास मिळालेल्या अपिलांच्या कोणत्याही अधिकारापासून वंचित व्हावे लागेल अशा प्रकारे या नियमांमधील कोणत्याही बाबीचा अन्वयार्थ लावला जाणार नाही.

(३) या नियमांच्या प्रारंभापासून अशा प्रारंभापूर्वी देण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाविरुध्द केलेले एखादे अपील किंवा पुनर्विलोकनासाठी केलेला अर्ज हा, असा आदेश जणू काही या नियमांनुसार काढण्यात आला होता असे मानून दाखल किंवा सादर करण्यात येईल.

परंतु असे की, या नियमांच्या प्रारंभापूर्वी अंमलात असलेल्या कोणत्याही नियमान्वये कोणतेही अपील किंवा पुनर्विलोकन करण्यासाठी तरतूद करण्यात आलेला कोणताही कालावधी कमी होईल अशा प्रकारे या नियमांमधील कोणत्याही बाबीचा अन्वयार्थ लावण्यात येणार नाही.

**[३३७]२८. शंकानिरसनः-**

कोणतेही [३३८]प्राधिकारी हे दुसऱ्या कोणत्याही [३३९]प्राधिकाऱ्यापेक्षा दुय्यम दर्जाचे आहे, की त्याच्या वरच्या दर्जाचे आहे, अशी शंका उद्भवल्यास अथवा या नियमांमधील कोणत्याही तरतूदीच्या अर्थविवरणाबाबत शंका उद्भवल्यास सदर बाब महानगरपालिका आयुक्तांकडे निर्देशित करण्यात येईल व त्याबाबतीत महानगरपालिका आयुक्तांचा निर्णय हा अंतिम असेल.

---

[३३७] ''अनु.क्र.३०'' या ऐवजी ''अनु.क्र.२८'' असा बदल करण्यात आला.

[३३८] ''प्राधिकरण'' या शब्दाऐवजी ''प्राधिकारी'' हा शब्द दाखल करण्यात आला.

[३३९] ''प्राधिकरणापेक्षा'' या शब्दाऐवजी ''प्राधिकाऱ्यापेक्षा'' हा शब्द दाखल करण्यात आला.

*****